# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०१६ / फाल्गुन २७, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(२) परिवहन मंत्री**<br>**(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७७**

---

**कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांना बनावट सेंद्रिय खतांची विक्री होत असल्याबाबत**

**(१) * ४६६६७ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यात बनावट सेंद्रिय खते परजिल्ह्यातील काही एजंट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन विकत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी कृषि विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) चौकशीअंती मे.नवभारत फर्टिलायझर्स लि. हैद्राबाद कंपनीच्या, नाशिक जिल्ह्यातील तीन वितरकांचे परवाने, कायमस्वरुपी रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच कंपनीच्या विरोधात दि.४.१.२०१६ रोजी देवळा पोलीस स्टेशन येथे नोंद क्रमांक ३/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील वैतरणा, सूर्या नदी व खाडी पात्रात अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(२) * ४८६५८ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वैतरणा, सूर्या नदी व खाडीच्या पात्रातील उत्खननावर व वाहतुकीवर बंदी असताना सक्शन पंपाद्वारे बेकायदा वाळू उत्खनन व वाळू वाहतूक स्थानिक पोलिसांच्या मदतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिकांनी वाळू माफियांवर कारवाई करण्याची मागणी दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उत्खनन व वाळू वाहतूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पालघर जिल्हयातील खाडीपात्रात सक्शन पंपाद्वारे वाळूच्या अवैध उत्खननाची २ प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली असून, त्याबाबत पोलीसात गुन्हे दाखल केले आहेत.

अशा प्रकरणात स्थानिक पोलिसांची संगनमत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) वैतरणा व सूर्या नदी आणि खाडीच्या पात्रातील रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत कारवाई करण्यासंबंधी दिनांक ०७/१२/२०१५ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी पालघर यांना प्राप्त झाले आहे.

(३) व (४) पालघर जिल्हयात वैतरणा व सुर्या नदी आणि खाडीपात्रातील वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुका स्तरावर तपासणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. पालघर व वसई तालुक्यात सदर पथकांमार्फत केलेल्या कारवाईत सन २०१५-१६ मध्ये एकूण ५५९ वाहनांच्या संदर्भात एकूण रू. ८०.६१ लाख इतका दंड संबंधितांकडून वसूल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयात २५ टक्केच पीक कर्जाचे वाटप झाल्याबाबत**

**(३) * ४६९९३ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शेतक-यांना रब्बी हंगामातील विविध पिकांसाठी वेगवेगळया बँकामार्फत केवळ २५ टक्केच पीक कर्जाची रक्कम वाटप झालेली असून, प्रत्यक्षात ३१० कोटी रुपये कर्जाचे वाटप करण्याचे निश्चित असतांनाही दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत २४६३३ शेतक-यांना १७३ कोटी रुपयांचेच कर्ज वाटप केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उर्वरित कर्जाची रक्कम वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,
नांदेड जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी ठरवलेल्या रुपये ३१०.२६ कोटी उद्दिष्टा पैकी दि. ३१.०१.२०१६ पर्यंत रुपये २३७.०० कोटी म्हणजेच ७६% रब्बी पीक कर्ज वाटप झालेले आहे.
(२) प्रश्न उद्‍भवत नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात दुष्कळी परिस्थितीमुळे रब्बी पिकांचे झालेले नुकसान

**(४) * ४८१३९ अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे रब्बी पिकांचे नुकसान झाले असून हरभरा उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांचे एकरी एक ते दोन क्विंटल उत्पादन झाल्याने भावही जेमतेम मिळत असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीअंती अमरावती जिल्ह्यातील हरभरा उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. अमरावती जिल्ह्याचे रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १,४७,९०० हेक्टर इतके असून, रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये १,४३,१०० हेक्टर म्हणजेच ९७% क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. त्यापैकी ९५,१०० हेक्टर क्षेत्रावर हरभरा पिकाची पेरणी झालेली आहे. हरभरा पिकांची कापणी/मळणी पूर्ण झालेली नसल्याने उत्पन्नाची अंतिम आकडेवारी प्राप्त झालेली नाही. तथापि, नजर अंदाजानुसार हरभरा पिकाची उत्पादकता ६ ते ८ क्विंटल प्रति हेक्टर अपेक्षित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे मोहजारोड सावरगाव (ता.वाशिम) येथील तलावातून**
**गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत**

**(५) * ४९८५३ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोहजारोड सावरगाव (ता.वाशिम) दरम्यान असलेल्या जि.प. लघु सिंचन विभागातील तलावात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करण्याच्या प्रकरणामध्ये तहसिलदार, वाशिम यांनी बुलढाणा जिल्ह्यातील श्रीपल सिध्द कंन्स्ट्रक्शन, साखरखेर्डा या कंपनीला ३.४० कोटीचा दंड केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीकडून दंड वसूल करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) संबंधित कंत्राटदार यांनी वाशिम तालुक्यातील मौजे मोहजारोड सावरगाव येथील जि.प. लघु सिंचन तलावातून २००० ब्रास मुरुम व दगडाचे अवैध उत्खनन करुन मौजे नागठाणा ते मोहजा रस्त्याच्या कामासाठी वापर केल्याचे निदर्शनास आल्यावरुन संबंधिताविरुध्द दंडात्मक रक्कम आकारण्याविषयी आदेश पारित करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी फौजदारी कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील तसेच कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन अनुदानाचे वाटप करण्याबाबत

**(६) * ४२६५१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील पूर्व भागात गेल्यावर्षी ठिबक सिंचन अनुदानासाठी सुमारे ३५० तर यावर्षी ३०० शेतकऱ्यांकडून प्रस्ताव शासनाकडे आले आहेत शासनाकडून कृषी विभागाला त्यासाठीचे सुमारे सव्वा कोटीचे अनुदान वर्गही झाले असून, काही मोजक्या शेतकऱ्यांना अनुदान मिळाले परंतु अनेक शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्हयात कृषि विभागातील कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या योजनेतील अनुदानास पात्र ३४४२ शेतकऱ्यांपैकी १६६२ शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यामध्ये सन २०१४-१५ या वर्षात २३३ प्रस्ताव प्राप्त झाले होते. केंद्र शासनाकडून उपलब्ध निधी व त्याप्रमाणात राज्य हिश्श्याचा निधी विचारात घेवून सदर तालुक्यासाठी रु.३७.५८ लाख एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सदर निधीतून १६८ प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. सन २०१५-१६ या वर्षात २९७ प्रस्तावांची ऑनलाईन नोंदणी झालेली आहे. केंद्र शासनाकडून पहिल्या हप्त्यापोटी प्राप्त झालेला निधी व त्याप्रमाणात

राज्य हिश्श्याचा निधी असा एकूण रु.४८.२६ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीच्या मर्यादेत १६१ प्रस्तावांना पूर्वसंमती देण्यात आली आहे. त्यापैकी ८२ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रु.१६.८६ लाख अनुदान वर्ग करण्यात आलेले आहे. उर्वरीत प्रस्तावांना अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(२) (३) व (४) कोल्हापूर जिल्ह्याची सन २०१३-१४ मधील ३४४२ प्रलंबित प्रकरणांपैकी उपलब्ध निधीच्या मर्यादेत १७८१ प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. निधी उपलब्धतेनुसार उर्वरीत प्रस्तावांना अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील वाळू, खडी, डबर व जांभा यांचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(७) * ४५१८४ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गौणखनिज उत्खनन करण्यास बंदी घालण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३१ मे, २०११ मध्ये दिलेले आदेश आजतागायत तसेच असतांनाही खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील वाळू, खडी, डबर व जांभा यांचे उत्खनन करुन उत्पादन घेतले जाते अशा तक्रारी जिल्हाधिकारी, रत्नागिरी व खेड तालुक्याच्या दौऱ्यावर असताना मा.मुख्यमंत्री यांच्याकडे ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने बेकायदा वाळू, खडी, डबर व जांभा यांचे जमिनी व खाडीमध्ये उत्खनन करुन उत्पादन करणाऱ्या व्यावसायिकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) केंद्र शासनाने सन २०१० मध्ये रत्नागिरी जिल्ह्यात अधिस्थगन लागू करुन, गौण खनिज उत्खननास बंदी घातली होती. त्यानंतर केंद्र शासनाने सन २०१३ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रातील

(Ecologically Sensitive Area) २९२ गावे वगळता, उर्वरित गावातील अधिस्थगन उठविला आहे. खेड तालुक्यातील ७४ गावे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रामध्ये येत असून, या गावात गौण खनिजाच्या उत्खननास परवानगी देण्यात आली नाही. खेड तालुक्यातील उर्वरीत गावांमध्ये काळादगड, जांभा व मातीचे १०७ परवाने देण्यात आले आहेत. खेड तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत केलेल्या पथकाने सन २०१५-१६ या वर्षात ५४ प्रकरणांत रु. ३०,०१,८६२/- एवढी दंडाची रक्कम वसुल केली आहे.

-----------------

**अकोट (जि.अकोला) तालुक्यात केळीची निकृष्ट दर्जाची बियाणे देवून शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(८) * ५०५९० श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील केळीची निकृष्ट दर्जाची बियाणे देवून शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंद्रायणी जातीचे बियाणे मिळविण्यासाठी शेतकऱ्यांची मागणी असताना दुसऱ्याच कंपनीचे बियाणे गणराज केला ग्रुपच्या मालकांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शेतात काहीच उत्पादन झाले नसल्यामुळे शेतकऱ्यांचे ७० लाखापेक्षा जास्त नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संबंधीची तक्रार शेतकऱ्यांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनला दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे

(३) शेतक-यांच्या पहिल्या वर्षाच्या उत्पादनामध्ये साधारणत: ७० टक्के घट होऊन पुढील वर्षाचे खोडवा पिकाचे उत्पन्न होण्याची स्थिती आढळून येत नाही.

त्यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे, असा तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीचा अहवाल आहे.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

मे.इंद्रायणी ॲग्रोटेक पणज ता.अकोट, जि.अकोला, मे.वसंत बायोटेक पुसद, जि.यवतमाळ व मे.माऊली हायेटेक नर्सरी सोलु ता.खेड, जि.पुणे या कंपन्यांनी, बियाणे नियंत्रण आदेश १९८३ चे कलम ३,९,१८ व जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३ ,७ चे उल्लंघन केल्याने, त्यांच्यावर दिनांक २७/०२/२०१६ रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन, अकोट, जि.अकोला येथे र.नं.१४/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून तपास प्रगतीपथावर आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे (पुर्व) येथे अभियांत्रिकी महाविद्यालय व वसतीगृह बांधण्यासाठी दिलेला भुखंड खाजगी विकासकाला विकल्याबाबत

**(९) * ४४८४० श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा मित्र मंडळ या संस्थेला अभियांत्रिकी महाविद्यालय व वसतीगृह बांधण्यासाठी मुंबईतील वांद्रे (पुर्व) येथे सर्वे क्रमांक ३४१ मध्ये ११,००० चौरस मिटर जागा १९८१ मध्ये देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील गरीब व गुणवंत मुलांच्या वसतिगृहासाठी शासनाने दिलेला हा भुखंड खाजगी विकासकाला विकण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा मित्र मंडळ या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी याप्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आसणाऱ्या पदाधिकाऱ्यांविरोधात व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक १५.१२.१९८१ अन्वये मौ. वांद्रे, ता. अंधेरी येथील स.नं. ३४१ (पै), ११,००० चौ.मी. जमीन मराठवाडा मित्र मंडळास ९९ वर्षाच्या भाडेपट्याने वसतीगृह व कम्युनिटी हॉल या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक १९.५.२००९ अन्वये सदरची जमीन मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त “अभियांत्रिकी महाविद्यालय व व्यवस्थापन महाविद्यालय” करिता कब्जेहक्काने मंजूर करण्यात आली आहे.
(२) अशा आशयाचा तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास प्राप्त झाला आहे. मात्र, अशी परवानगी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिलेली नाही.
(३) मा. मुख्यमंत्री कार्यालयातील संगणक प्रणालीवर मराठवाडा मित्र मंडळ या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे दिनांक ४.१.२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. मात्र, अशा आशयाच्या तक्रारी दिनांक १७.१२.२०१५ व ७.१.२०१६ रोजी मा. मुख्यमंत्री कार्यालयात प्राप्त झाल्या आहेत.
(४) व (५) शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून अहवाल अप्राप्त आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येऊर (जि.ठाणे) येथील आदिवासीपाड्यातील आदिवासींच्या जमिनीवर अनधिकृतपणे बांधकाम केल्याबाबत

**(१०) * ४१८४७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) येथील पाटोणपाडा व जांभूळपाडा या आदिवासी पाडयातील जमिनीवर सुपर ड्रीम्स इस्टेट लि. या कंपनीने अतिक्रमण करुन अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची जागा शासनाच्या भविष्य निर्वाह निधी या विभागासाठी राखीव असताना, कंपनीने महसूल अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कागदपत्रात फेरफार करुन ही जागा बळकावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कंपनीने लीज तसेच बांधकामाची परवानगी न घेता बांधकाम सुरु केल्यानंतर तेथील स्थानिकांनी याबाबत वारंवार तक्रारी करुनसुध्दा तेथील अधिकाऱ्यांनी कारवाई न करता जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बांधकामामुळे स्थानिक आदिवासींची असलेली वहिवाट रोखण्यात आल्यामुळे स्वत: जिल्हाधिकारी यांनी या जागेवर येवून पाहाणी करुन संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याचे आदेश देवूनही अद्याप पर्यत याप्रकरणी कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर व अतिक्रमण करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे जांभुळपाडा येथील जाणे-येणेसाठी असलेला रस्ता बंद झाल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे प्राप्त झाली आहे. तथापि, प्रश्नाधीन जमिनीच्या अधिकार अभिलेखात "भारत सरकार तर्फे इन्व्हेस्टमेंट प्राव्हीडन्ट कंपनी तर्फे मॅनेजर व वहिवाटदार जी.जी.प्रधान" यांचे नाव दाखल असून इतर हक्कात भाडेपट्टाधारक व पोट भाडेपट्टाधारक यांची नावे आहेत. पोट भाडेपट्टाधारकांमध्ये सुपर ड्रिम रिअल इस्टेट प्रा.लि. यांच्या नावाची ही नोंद आहे.

(२) अशा बाब निदर्शनास आली नाही.

(३) मौजे येऊर, ता.जि.ठाणे येथील स.नं. १२/२, ३ या भूखंडावरील विकास प्रस्तावाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका यांनी दि.२०/१०/२०१२ व

दि.०२/०२/२०१६ च्या पत्रान्वये ना मंजूरी कळविली असून सदर भूखंडावरील इमारतीचे नकाशे मंजूर केलेले नाहीत. अथवा बांधकामास परवानगी दिलेली नाही.

(४), (५) व (६) सदरची बाब निदर्शनास येताच जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. ११/०१/२०१६ रोजी समक्ष भेट देऊन दिलेल्या सुचनानुसार तहसिलदार, ठाणे यांच्याकडून आदिवासी नागरिकांच्या वहिवाटीचा रस्ता खुला करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे गलवाडा (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथे आठ वर्षीय मुलीच्या अंगावर विद्‌युत वाहीनी पडल्याबाबत**

**(११) * ५०००३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गलवाडा (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथे ८ वर्षीय मुलीच्या अंगावर दिनांक २९ ऑक्टोंबर २०१५ रोजी ११ के.व्ही. विद्‌युत वाहीनी तुटून पडल्याने ती गंभीर जखमी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातात जखमी झालेल्या मुलीचे दोन्ही हात उपचारादरम्यान कोपऱ्यापासून काढुन टाकण्यात आल्याने मुलीला कायमस्वरुपी अपंगत्व आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अपघातात जखमी झालेल्या मुलीस शासनाकडून अर्थिक मदत देण्याबाबत व दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी विद्‌युत निरीक्षक,औरंगाबाद यांनी दिनांक २७.१२.२०१५ रोजी चौकशी केली आहे.

(४) अपघातात जखमी झालेल्या मुलीस महावितरण कंपनीकडून रु. ५,०००/- ची आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. सदर अपघाताबाबत उप-कार्यकारी अभियंता,

महावितरण, सोयगांव उपविभाग यांना विद्युत निरीक्षक, औरंगाबाद यांनी दिनांक २८.१२.२०१५ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात रब्बी हंगामात रासायनिक खत उत्पादक कंपन्यांनी साठा पूर्णपणे उपलब्ध करुन दिला नसल्याबाबत

**(१२) * ४९९३३ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात रब्बी हंगामात रासायनिक खत उत्पादक कंपन्यांनी त्यांना मंजूर केलेला साठा पूर्णपणे उपलब्ध करून देणे आवश्यक असतानाही हा साठा उपलब्ध झालेला नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तब्बल ७५ हजार मेट्रिक टन खते जिल्ह्यात पोहोचलीच नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती रासायनिक खत उपलब्ध करुन न देणाऱ्या कंपन्याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

रब्बी हंगाम २०१५-१६ करिता नाशिक जिल्ह्यासाठी २,०१,१००/- मे . टन रासायनिक खतांचे आवंटन मंजूर करण्यात आलेले असून दि. १५.०२.२०१६ अखेर १,३५,७३३/- मे. टन खताचा पुरवठा करण्यात आलेला आहे. रासायनिक खताची टंचाई नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गालगत मोहोप्रे (ता.महाड) गावाच्या हद्दीत मातीचे उत्खनन होत असल्याबाबत

**(१३) * ४९१५१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामार्ग, नदी व खाडी पात्रापासून ५०० कि.मी. अंतरावरुन कोणत्याही प्रकारचे उत्खनन करण्यास परवानगी नसतांना देखील मुंबई-गोवा महामार्गालगत तसेच गांधारी नदीच्या किनारी मोहोप्रे गावाच्या हद्दीत मोठ्या पोकलेन, जेसीबी मशीनच्या सहायाने बेसुमार मातीचे उत्खनन करुन डोंगर फोडण्यात येत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोहोप्रे हद्दीत मोठ्या प्रमाणावर बेसुमार माती उत्खनन सुरु असून याकडे महसूल विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उत्खननामुळे मुंबई-गोवा या मार्गावरुन होणाऱ्या वाहतुकीला देखील प्रचंड धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मातीचे उत्खनन करणाऱ्या माफियांवर व दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे मोहोप्रे. ता. महाड येथील गट नं. ७३ मध्ये ५० ब्रास मातीचे विनापरवानगी उत्खनन करुन रस्त्याच्या भरावासाठी वापर केल्याचे फेब्रुवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे. त्यावरुन सदर प्रकरणी संबंधितांना दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

सदर ठिकाण गांधारी नदीपासून २०० मी. अंतरावर व राष्ट्रीय महामार्गालगत आहे. मात्र सदर उत्खननामुळे मुंबई-गोवा मार्गावरील वाहतुकीला धोका झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे इंचनाळ (ता.गडहिंग्लज) येथील इनाम मिळालेली**
**शेतजमीन बेकायदेशीर विकल्याबाबत**

**(१४) * ४६३४४ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इंचनाळ (ता.गडहिंग्लज) येथील प्राचीन श्री.स्वयंभू गणेशाची पुजा अर्चा आणि देखभालीसाठी इनाम मिळालेली ६ एकर २९ गुंठे बागायती देवस्थान शेतजमीन वहिवाटदाराने आपल्या प्रापंचित कारणासाठी गावातील एका बड्या पुढाऱ्यास बेकायदेशीर विकली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोटयावधी रुपयांची जमीन देवस्थानच्याच मालकीची राहावी म्हणून काही जागरुक ग्रामस्थ, गणेशभक्त आणि कार्यकर्त्यांनी जमीन विकण्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे इंचनाळ, ता. गडहिंग्लज येथील श्री गणपती देवस्थानाच्या देखभालीसाठी इनाम मिळालेली देवस्थान शेतजमीन वहिवाटदाराने श्री आनंदा धोंडिबा पोवार या व्यक्तीस विकली. तहसिलदार, गडहिंग्लज यांच्या दिनांक १६/९/२००८ त्या आदेशान्वये फेरफार क्र. १९७४ हा फेरफार घेण्यात आला.सदर जमीन देवस्थानाच्या मालकीची राहावी म्हणून श्री धनाजी पंडित व इतर ११३ ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांच्याकडे अपिल अर्ज सादर केला असता त्यावर त्यांनी दिनांक १९/११/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये उक्त फेरफार रद्द करून प्रश्नाधीन जमिनीच्या पीकपहाणी सदरी दाखल झालेली नांवे कमी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सदर मिळकतीच्या उत्पन्नाच्या विनियोगाची चौकशी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने करावी असेही आदेश दिले आहेत. सदर आदेशाविरूध्द श्री आनंदा धोंडिबा पोवार यांनी अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केळशी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे बेकायदेशीररित्या कन्व्हेअर बेल्ट उभारल्याबाबत**

**(१५) * ३९९१० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळशी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील केळशी-उंबरशेत गावाच्या सीमेवर आशापुरा माईनकेम कंपनीने लोकवस्तीलगत बेकायदेशीररित्या कन्व्हेअर बेल्ट उभारल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कन्व्हेअर बेल्टची जागा औदयोगिक बिनशेती केलेली नसल्याने कन्व्हेअर बेल्ट बंद करावा, अशी नोटिस तहसीलदार, दापोली यांनी कंपनीला देवून देखील कंपनीने काम सुरूच ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कन्व्हेअर बेल्टमुळे या परिसरातील रहिवाशांना घसा व डोळयांचे विकार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कंपनीवर व दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे उंबरशेत, ता.दापोली येथे मे. आशापुरा माईन केम लि. या कंपनीच्या अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापराबाबत तहसिलदार, दापोली यांनी केलेल्या चौकशीत सदर कंपनीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीअन्वये आवश्यक परवानगी न घेता विषयांकित जमिनीचा अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापर केल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार तहसिलदार, दापोली यांनी दि.६/१/२०१६ राजी कंपनीस कन्व्हेअर बेल्टचे काम तात्काळ बंद करण्याबाबत निर्देश दिलेले असून अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापराबाबत रु. ६०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई केली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने देखील दि.२९/१/२०१६ रोजी सदर कंपनीस जल (प्रदुषण नियंत्रण व प्रतिबंध) अधिनियम १९७४, हवा (प्रदुषण नियंत्रण व प्रतिबंध) अधिनियम १९८१ आणि घातक घनकचरा (व्यवस्थापन,

हाताळणी व वाहतूक) नियम २००८ अन्वये अंतरिम निर्देश निर्गमित केले आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी दि.२०/२/२०१६ रोजीचे आदेशान्वये कंपनीस उत्खनन थांबवण्याबाबत आदेश पारित केले असून सदर आदेशाविरुध्द कंपनीने खेड येथील न्यायालयात अपील दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. कन्व्हेअर बेल्टमुळे या परिसरातील रहिवाशांना घसा व डोळ्यांचे विकार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सिलीका खाणीमधून बेकायदा उत्खनन होत असल्याबाबत

**(१६) * ४१२२८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कासार्डे येथील सिलीका खाणीमधून राज्यातील काच कारखान्यांना कच्चा व पक्का मालांचा प्रचंड प्रमाणात पुरवठा करुन शासनाचे खाणी संबंधीचे सर्व नियम डावलून जैवविविधतेचा व पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने तेथील जनतेने मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, आदींकडे मागील अनेक वर्षापासून तक्रारी करुन सुध्दा दररोज सुमारे ३०० हून अधिक बेकायदा सिलीका वाळूचे उत्खनन होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदा व नियमबाहय करण्यात येणाऱ्या सुरूंग व ब्लास्टिंगमुळे गावातील घरांना निर्माण झालेला धोका, शेकडो एकर जमिनीचे झालेले नुकसान, नदीचे पाणी दुषित झाले असून रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कासार्डे येथे बेकायदेशीर सिलीका वाळूचे सर्रासपणे प्रचंड प्रमाणात होत असलेले उत्खनन व वाहतूकीमुळे शासनाचे रॉयल्टीपोटी दररोज मिळणाऱ्या लाखो रुपायांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कासार्डे येथे मागील अनेक वर्षापासून सुरू असलेल्या सिलीका वाळू उत्खनन व वाहतूकीच्या विरोधात तेथील ग्रामस्थांनी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.महसूल मंत्री, मा.पालक मंत्री, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, तहसलिदार, कणकवली, खनिककर्म अधिकारी, सिंधुदुर्ग ओरोस आदींकडे तक्रारी करूनही या खाण व्यावसायिकांवर कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकाशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खाण व्यावसायिकांवर व तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त तक्रारीनुसार मौजे कासार्डे येथील सिलिका खाणपट्टयांची पाहणी करण्यात आली. सदर ठिकाणी ३ सिलीका खाणपट्टे मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी एका खाणपट्टयाची मुदत संपुष्टात आल्याने उत्खनन बंद आहे. उर्वरित २ खाणपट्टयापैकी एका खाणपट्टयामधून उत्खनन बंद असून एका खाणपट्टयामधून उत्खनन सुरु आहे.

खाणपट्टयाच्या पाहणीत कोणत्याही प्रकारची ब्लास्टिंग साधने आढळून आली नाहीत. तसेच नदीक्षेत्राची पाहणी केली असता खाणपट्टयापासून नदीपात्र सुमारे ५ कि.मी. अंतरावर असल्याचे दिसून आले. त्यामुळे ब्लास्टींगमुळे गावातील घरांना धोका होणे, जमिनीचे नुकसान होणे व नदीचे पाणी दुषित होणे तसेच रस्त्याची दुरावस्था झाल्याचे निदर्शनास आले नाही.

खाणपट्टाधारकाने भूपृष्ठ भाडे व अकृषिक आकारणी दंडासहित भरली आहे.

सदर ठिकाणच्या खाणपट्टयामधून सिलीकाचे उत्खनन मोठ्या प्रमाणावर झाले असल्याने, खाणपट्टयाच्या सिमांकनाची मोजणी झाल्याशिवाय नेमके किती उत्खनन झाले हे स्पष्ट होणार नाही. त्यादृष्टीने सदर खाणपट्टयामध्ये सिमांकनाचे स्तंभ (बाऊंड्री पिलर) त्वरीत उभारण्याबाबत संबंधित कंपन्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) समुद्रकिना-यावरील अवैध वाळू उपशाने समुद्र किनारा खचल्याबाबत

**(१७) * ४८३५४ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) समुद्रकिना-यावरील होत असलेल्या अवैध वाळूच्या उपशामुळे समुद्र किनारा खचल्याने सुरुच्या बागा व बंदराच्या किनाऱ्यांची धूप होऊन पर्यावरणाची हानी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाकटी डहाणू, चिंचण, दिवा दांडा, डहाणू मांगेलवाडा, नरपड, सतीपाडा इ, समुद्र किनाऱ्यांवर प्रचंड प्रमाणांवर अवैध वाळूचा उपसा रात्रदिवस होत असल्याची तक्रार वारंवार स्थानिक नागरीकांकडून करण्यात येऊनही महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित अधिकाऱ्यांवर व वाळू उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) डहाणु तालुक्यातील स्थानिक नागरिकांकडून समुद्र किनाऱ्यावर वाळू व रेती चोरी होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानुसार, फिरत्या पथकामार्फत वेळोवेळी तसेच अचानक तपासण्या करण्यात येतात. त्यानुसार सदर पथकामार्फत केलेल्या तपासणीत समुद्र किनारी वाळूच्या अवैध वाहतूक प्रकरणी संबंधितांविरुध्द ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच डहाणू तालुक्यात सन २०१५-२०१६ या वर्षात वाळूच्या अवैध वाहतूकीबाबत ७९ वाहनांवर रुपये ७८.६७ लाख एवढा दंड आकारण्यासंबंधी आदेश पारीत केले आहेत.

डहाणू तालुक्यात वाळू उपशामुळे समुद्र किनारा खचून सुरुच्या बागा व किनाऱ्याची धुप झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (जि.रत्नागिरी) वाहनधारकांची दलालाकडून होत असलेली फसवणूक

**(१८) * ४६३८३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (जि.रत्नागिरी) दलाल दिवसेंदिवस वाढत असून "जी" फॉर्मसाठी त्यांचेकडून भरमसाठ पैशांची आकारणी करुन वाहनाधारकांची लुट सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलाल मुक्त आरटीओ कार्यालय करण्याची परिवहन आयुक्त यांनी घोषणा केली, त्यानुसार दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी राज्य शासनाच्या आदेशानुसार कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहनधारकांची दलालाकडून होत असलेली फसवणूक थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये-

१) कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी ओळखपत्राचा वापर करणे.
२) अनधिकृत व्यक्तींचे प्रवेशास व वावरास बंदी.
३) कामकाज विषयक माहितीचे फलक प्रसिध्द करणे.
४) कार्यालयाचा कामकाज विषयक नकाशा प्रदर्शित करणे.
५) तक्रार पेटी/रजिस्टर ठेवणे.
६) माहितीचा अधिकार/सेवा हमी कायद्याचे फलक प्रसिध्द करणे.
७) अधिकारी/कर्मचारी यांची नावे प्रदर्शित करणे.
८) प्राधिकृत व्यक्तीमार्फतच काम स्विकारणे.
९) एक खिडकी योजना.

याप्रमाणे रत्नागिरी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयातील स्टोन क्रेशर व खदान मालकांनी स्वामीत्वधनाच्या महसूलाचा भरणा न केल्याबाबत**

**(१९) * ४८९५१ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील २४ स्टोन क्रेशर व खदान मालकांनी शासनाकडे स्वामीत्वधनाच्या महसूलाचा भरणा वेळेत न केला असल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैधपणे गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या माफीयांवर कठोर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधिक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खणीकर्म यांची संयुक्त समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दिनांक २७/११/२०१५ च्या आदेशान्वये जिल्हयातील २४ दगडखाणींची मोजणी करण्याचे आदेश दिले आहेत.
(२) होय.
(३) व (४) सदर २४ दगड खाणींच्या मोजणी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित तहसिलदार यांना सदर दगडखाणधारकांकडून स्वामित्वधनाच्या फरकाची रक्कम वसूल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ठिबक संच अनुदानाचे प्रस्ताव रद्द केल्याबाबत**

**(२०) * ४२२५८ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावर डाळिंब, केळी व ऊस या प्रमुख पिकांच्या नोंदी नसल्यामुळे तालुक्यातील सुमारे १२०० ठिबक संच अनुदानाचे प्रस्ताव रद्द केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी स्वयंघोषणा पत्र देण्याच्या अटीवर ठिबकचे नव्याने पुन्हा प्रस्ताव मंजूर करुन देण्याचा निर्णय पंढरपूर तालुका कृषी विभागाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करुन शेतकऱ्यांना ठिबक संच अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) नाही
सुक्ष्म सिंचन योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आर्जासोबत ७/१२ चा उतार जोडणे आवश्यक आहे. सदर उताऱ्यावर पिकाची नोंद असणे आवश्यक आहे. सन २०१३-१४ या वर्षाच्या प्राप्त झालेल्या सुक्ष्म सिंचन संचाच्या काही अर्जासोबतच्या ७/१२ उताऱ्यावर पिकाच्या नोंदी नव्हत्या. अशा अर्जाच्या बाबतीत संबंधीत तलाठ्याचा पीक नोंदणी दाखला जोडावा, हा दाखला प्राप्त झाला नाही तर संबंधित पीक घेतल्याबाबतचे शेतक-यांचे घोषणापत्र अर्जासोबत जोडण्याबाबत शेतक-यांना कळविण्यात आले होते व त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
पंढरपूर तालुक्यात एकूण ३५५९ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत १११६ लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आले आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित लाभार्थ्यांचे अनुदान देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैजापूर शहर (ता.वैजापूर) येथे महसूल प्रशासनाने केलेल्या पाहणीत अवैध वाळू साठा आढळून आल्याबाबत**

**(२१) * ४१२९७ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर तालुक्यातील महसूल प्रशासनाने केलेल्या पाहणीत सुमारे १७७५ ब्रॉस इतका अवैध वाळू साठा आढळून आल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणातील बेकायदेशीर वाळू उपसाकरुन साठा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषींना अटक करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) वैजापूर तालुक्यातील भरारी पथकाने दिनांक २९.१२.२०१५ ते दिनांक ०८.०१.२०१६ या कालावधीत वैजापूर शहर व परिसरात वाळूच्या अवैध साठ्याची तपासणी केली असता, १७७५ ब्रास वाळूचा अवैध साठा आढळून आला. तहसिलदार वैजापूर यांनी सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करुन, संबंधितांविरुध्द दिनांक १८.०२.२०१६ रोजी दंडात्मक रक्कम आकारण्यासंबंधी आदेश पारित केले आहेत.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील टोरंट पॉवर लि.या विद्युत कंपनीच्या कारभाराच्या तक्रारींबाबत

**(२२) * ४४६९४ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील टोरंट पॉवर कंपनीकडून भिवंडी परिसरातील ग्राहकांची जादा विज वापर मीटर रिडींग घेण्यात येणे, वीज देयके भरमसाठ येणे व इतर बाबतीत ग्राहकांवर अन्याय होत असल्याबाबत भिवंडी येथील शांतीनगर पॉवरलूप विन्हर्स वेल्फेअर असोशिएशन तर्फे मा.चेअरमन महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी कमिशन, व्यवस्थापकीय संचालक, एम.एस.इ.डी.सी.एल.विद्युत भवन आणि मुख्य अभियंता, एम.एस.इ.डी.सी.एल. भांडूप यांचेकडे दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार पाठविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) येथील टोरंट पॉवर लि.या विद्युत कंपनीविरुध्द भिवंडी येथील महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी कन्झ्युमर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक ९ एप्रिल, २०१४, दिनांक १ डिसेंबर, २०१४, दिनांक ७ सप्टेंबर, २०१५, दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ व दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिव, प्रधान सचिव, उर्जा विभाग, व्यवस्थापकीय संचालक,

प.दा.वि.प. पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त ठाणे, मुख्य अभियंता, म.रा.वि.म. भांडूप, दक्षता आयुक्त, म.रा.वि.प. इत्यादीकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने टोरंट पॉवर कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. वर नमूद केलेल्या तक्रारीपैकी फक्त दोन तक्रारी महावितरण कंपनीस प्राप्त झाल्या आहेत.

(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने भरमसाठ आलेले बिलासंदर्भात असलेली तक्रारीबाबत चौकशी केली आहे.

(४) मे. टोरंट पॉवर कंपनी यांना वीज दरवाढ करण्याबाबत कुठलेही अधिकार नाहीत. वेळोवळी लागू झालेली वीजदरवाढ ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार महावितरण कंपनीतील सर्व ग्राहकांना लागू करण्यांत येते.त्याप्रमाणे मे. टोरंट पॉवर कंपनी भिवंडी मंडळातील सर्व ग्राहकांना वीजदेयके देते.

टोरंट पॉवर कंपनीच्या कारभाराबाबत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे निराकरण वेळोवेळी करण्यात आलेले आहे. भिवंडी येथील वीज ग्राहकांना टोरंट पॉवर यांच्या कारभाराबाबत कोणतीही तक्रार असल्यास व सदर तक्रारींचे निराकरण टोरंट पॉवर कंपनीकडून न झाल्यास त्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरण कंपनीने अधिक्षक अभियंता, भिवंडी यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मुख्य अभियंता, भांडूप शहर परिमंडळ यांची अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर व्यवस्थेबाबतची माहिती/निवेदन ग्राहकांकरिता भिवंडी येथील स्थानिक/ दैनिक वर्तमानपत्रातून मराठी व उर्दू भाषेतून प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने टोरंट पॉवर कंपनीच्या कारभाराबाबत आय.आय.टी.,मुंबई या त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशी करण्याबाबत महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील अवैध रेती उत्खननाबाबत

**(२३) * ४७८०० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात अवैध रेती उत्खनन होत असल्याच्या तक्रारी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसुल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेती घाटाच्या लिलाव प्रक्रियेस होत असलेल्या विलंबामुळे अवैध उत्खननाचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेती घाटाच्या लिलाव करण्याबाबत तसेच अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) बुलढाणा जिल्हयात रेतीचे अवैध उत्खननाबाबत डिसेंबर २०१५ वा त्यादरम्यान एकूण ७ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित तहसिलदार यांच्यामार्फत चौकशी करुन, वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाई करुन, एकूण रुपये ३,८१,९००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) शासनाच्या वाळू/रेती निर्गती धोरणातील तरतूदीनुसार वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतरच रेतीघाटाबाबत लिलाव प्रक्रिया पूर्ण करून वाळूचे उत्खननास परवानगी देण्यात येते. त्यानुसार सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता बुलढाणा जिल्हयातील एकूण ८६ वाळूगटांचे प्रस्ताव ऑगस्ट २०१५ मध्ये पर्यावरण विभागास सादर करण्यात आले होते. पर्यावरण विभागाकडून ८२ वाळू/रेती गटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी ४० वाळू/रेती गटांचे लिलाव यशस्वीरित्या करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वीज महापारेषण कंपनीला दुप्पट दराने उपकरणांचा पुरवठा करण्यात आल्याबाबत

**(२४) * ४०३२७ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.नितेश राणे (कणकवली), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ६ वर्षापूर्वी ५६६८ कोटी रूपयांचे कंत्राट देवूनही पारेषण कंपनीला राज्यात वीज वहनाचे नवी जोडणी उभी करता आली नसल्यामुळे त्यांचा सर्वाधिक तोटा सिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वीजवाहिन्या ओव्हरलोड झाल्या असल्याचे वीज पारेषण कंपनीला सन २००९ पासून समजल्यानंतर २००९ मध्ये टप्पा १ व टप्पा २ हे कितीतरी जादा दराने मे.ईसीआय, मे.अरेवा आणि ज्योती, मे.कल्पतरू, मे.आयसोलक्स, मे.केईसी या कंपन्यांना ५६६८ कोटी रूपयांचे वीजवाहिन्या आणि उपकेंद्र उभारण्याचे कंत्राट देण्यात आले असतानाही परत या कंपन्यांना काम सुरू करण्यासाठी १५५ कोटीची अग्रिम रक्कमही दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या वीजवाहिन्या व उपकेंद्राची भर न पडल्याने आपत्तकालीन भारनियमन आजही सुरू असल्याने नवे कंत्राट निश्चित करून एकच सोर्स असलेल्या ठिकाणी सोर्स वाढविण्याशिवाय भविष्यात भारनियमन कमी होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ५६६८ कोटीच्या वीजकंत्राटाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भारनियमन कमी करण्याबाबत व दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) महापारेषण कंपनीने या कंपन्यांसोबत रु. ५६६८ कोटींचा करार केलेला असला तरी प्रत्यक्षात १३३ कामांसाठी , टप्पा १ व टप्पा २ मिळून रु. २७७० कोटीचेच कार्यादेश दिले आहेत. सर्व निविदांमध्ये एकूण कमीत कमी दर असलेल्या निविदा विचारात घेण्यात आल्या व कार्यादेश देताना प्रचलित पध्दतीनुसार एकूण

मूल्य ग्राह्य धरून त्या अनुषंगाने एकूण न्युनतम मूल्य असलेल्या ठेकेदारास कामे दिली आहेत. तसेच करारातील अटींनूसार कंत्राटदारांना उपकरण/साहित्याची जुळवाजुळव करण्यासाठी रु. १५५ कोटी अग्रीम दिले आहे.

(३) महापारेषण कंपनीकडून उपकेंद्र व वाहिनी उभारणीत कोणताही खंड नसून महापारेषण प्रणालीच्या मर्यादेमुळे (System Constraint) भारनियमन करावे लागत असल्याच्या घटना फार कमी प्रमाणात आहेत.

(४) काही उपकेंद्राचा अपवाद वगळता उर्वरित उपकेंद्रे व वाहिन्याची कामे सुरळीत सुरु आहेत त्यामुळे चौकशीची आवश्यकता दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहिसर मोरी (जि.ठाणे) गावातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर बुजवून अनधिकृत गोदाम उभारल्याबाबत

**(२५) * ४१२०८ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विरेंद्र जगताज (धामणगांव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर-नागाव रस्त्यावरील दहिसर मोरी (जि.ठाणे) गावामध्ये असलेली सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर बुजवून त्या ठिकाणी अनधिकृत गोदाम बांधले असल्याची तक्रार तहसीलदार,ठाणे यांच्याकडे दिनांक १० जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचा तलाठ्याने सर्व्हे केला असता त्या ठिकाणी विहीर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत गोदाम बांधकाम करणाऱ्या व्यावसायीकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची करणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

त्याठिकाणी आज रोजी विहिर अस्तित्वात नाही.

(३) होय.

(४) संबंधित जागेमध्ये लोखंडी पाईप ठेवण्यात आलेले असून सदर जागेवर कुठल्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम केलेले नाही. त्यामुळे संबंधितांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या सिटी सर्व्हेचे काम सुरू असल्याबाबत**

**(२६) * ४१२९९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या सिटी सर्व्हेचे काम गेल्या सात वर्षांपासून संथ गतीने सुरू असल्याने या गावांतील दोन लाख ३२ हजार प्रॉपर्टी कार्डांचे काम रखडले असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांमध्ये जमिनीचे वाद, बेकायदा बांधकामे मोठ्याप्रमाणात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवेली भूमी अभिलेख कार्यालयात १९१० पासूनचे मिळकतीचे दस्त पैकी पन्नास टक्के दस्त वारंवार हाताळल्यामुळे जीर्ण झाले असल्याने त्यांचे स्कॅनिंग करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांत सिटी सर्व्हे लागू करण्याच्या दृष्टीने गावांचे सविस्तर मोजणीचे काम पुणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या खाजगी संस्थांमार्फत करण्यात येत आहे. त्यापैकी १९ गावांचे मोजणीचे काम पुर्ण झाले असून मौजे वडगांवशेरी, हडपसर, कळस व धानोरी या गावांचे सविस्तर मोजणीचे काम शिल्लक आहे.

(२) सिटी सर्व्हेचे काम संथ गतीने सुरु असल्यामुळे जमिनीचे वाद अथवा बेकायदा बांधकामामध्ये वाढ होत असल्याबाबत पुणे महानगरपालिकेस आढळून आलेले नाही.

(३), (४) व (५) उप अधीक्षक भूमि अभिलेख, हवेली कार्यालयाच्या अधिपत्याखालील १२४ गावांच्या अभिलेखांच्या स्कॅनिंगचे काम राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांअंतर्गत खाजगी संस्थांमार्फत पूर्ण करण्यात आले असून स्कॅनिंग झालेल्या अभिलेखांच्या प्रमाणित प्रती विहीत नक्कल 'फी' प्राप्त करुन नागरीकांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात पडलेल्या थंडीमुळे द्राक्ष बागांचे झालेले नुकसान**

**(२७) * ४७५२२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २०१६ पासून पडलेल्या कडाक्याच्या थंडीमुळे राज्यातील द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्राप्त अहवालानुसार असे आढळून येते नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुरेवाडा (जि.भंडारा) येथील गोसीखुर्द प्रकल्पबाधितांना विशेष पॅकेज व भूखंड देण्याबाबत

**(२८) * ४९४०६ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरेवाडा (जि.भंडारा) येथील १३१ कुटुंब हे गोसीखुर्द प्रकल्पबाधित असून त्यांना शासनाच्या विशेष पॅकेजचा अद्यापपर्यंत लाभ मिळालेला नाही व १३ कुटुंबांना भूखंड देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पबांधितांना पॅकेज घोषित करुनही त्यांना लाभ न देण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, सदर १३१ प्रकल्पबांधितांना विशेष पॅकेज व १३ कुटुंबांना भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

सुरेवाडी (जि.भंडारा) येथील एकुण ५१९ कुटुंबे गोसीखुर्द प्रकल्पबाधित असून त्यापैकी ४८१ कुटुंबांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर त्यांना शासनाच्या विशेष पॅकेजचा लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरीत ३८ कुटूंबांनी आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर त्यांना सुध्दा विशेष पॅकेजचा लाभ देण्याची कार्यवाह त्वरीत करण्यात येईल.

सन २००१ चे कुटूंब सर्व्हेक्षणानुसार मौजा सुरेवाडा येथे कास्तकार प्रवर्गातील २६८ व गैरकास्तकार प्रवर्गातील ३०४ अशी एकुण ५७२ कुटूंबे होती, सदर सर्व कुटूंबांना दि.०५/०६/२००८ रोजी तहसिलदर भंडारा यांचेद्वारे भुखंड वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी एकाच व्यक्तीची नावे दोनदा नमुद असल्याचे कारणामुळे ७ भुखंड वाटप दि.२९/०८/२००९ रोजी रद्द केले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळाच्या यादीत समाविष्ट झालेल्या गावांना मदत देण्याबाबत**

**(२९) * ४१५१५ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहूल कुल (दौंड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंतिम पैसेवारीनंतर दुष्काळाच्या यादीत समाविष्ट झालेल्या १२ हजार वाढीव गावांना मदत देण्यास “एनडीआरएफ” (राष्ट्रीय आपती व्यवस्थापन प्राधिकरण) ने नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १२ हजार वाढीव गावांना मदत न देण्याची प्रमुख कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना दुष्काळी मदतीपासून वंचित राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, राज्यातील १२ हजार वाढीव गावांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सन २०१५ च्या खरीप हंगामात १५७४७ गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे. दिनांक ३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्याचे निकष घोषित करण्यात आले आहेत. त्यानुसार दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पिक नुकसान झालेल्या अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक विभागातील कापूस , नागपूर, अमरावती विभागातील सोयाबिन व नागपूर विभागातील धान पिक उत्पादक शेतकऱ्यांना दिनांक २.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विशेष मदत जाहीर केली आहे.

सदरील निर्णयानुसार सुमारे १२ हजार गावातील पीक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे कृषी विभागातील अधिकारी शासनाकडून आलेले साहित्य, औषधे, बी-बीयाणे परस्पर विकत असल्याबाबत**

**(३०) * ४९७६६ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे शेतकऱ्यांना शासनाकडून दिली जाणारी शेती उपयोगी साहित्य, औषधे, व बी-बीयाणे शासनाने ठरवून दिलेल्या दराने शेतकऱ्यांना देणे आवश्यक असताना, कृषी विभागातील अधिकारी आलेले साहित्य, औषधे, बी-बीयाणे, आपल्या निवासस्थानी नेवून ठेवत असून घरुनच ते परस्पर विकत असल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही निविष्ठा साठवणूकीसाठी तालुका, मंडळ अथवा ग्रामस्तरावर शासकिय सुविधा नाही त्यामुळे प्राप्त निविष्ठा मंडळ कार्यायालमध्ये अथवा भाडेतत्वावरील गोडावूनमध्ये उतरवून घेतल्या जातात.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्नाटक सीमाभागातून येणा-या मद्य तस्करीस आळा घालण्याबाबत

**(३१) * ४६३३५ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात अनेक अवैध धंदे असून कर्नाटक सीमाभागातून अनेक गावात मदिरा येत असून विशेषत: हॉटेल, धाबे यासह काही अधिकृत परवानाधारक हॉटेलमध्येही सीमाभागातील ही मदिरा पोहचत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दारु तस्करीवर नियंत्रण ठेवणे स्थानिक पोलिसांसमोर आव्हान निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, कर्नाटकातून मद्य तस्करी करणारी टोळी मोठया प्रमाणात कार्यरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती कर्नाटक सीमाभागातून येणा-या मद्य तस्करीस आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४)

अंशत: खरे असून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अ) राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, इचलकरंजी यांनी शिवणाकवाडी ता. शिरोळ येथे दि.२४/११/२०१५ रोजी कर्नाटक सीमा भागातून अवैध मद्य ताब्यात घेऊन गु.र.क्र. २६५/२०१५ नुसार गुन्हा नोंद करुन बनावट मद्य व १ वाहन यांचेसह अंदाजित रक्कम रु.१,२२,९८६/- किमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

ब) दि. २६/१२/२०१५ रोजी कोरोची, ता. हातकणंगले येथे अचानकपणे छापा टाकून बनावट विदेशी मद्याची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर मुंबई दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(ब) (ड) (ई) (फ), ८३, १०८ अंतर्गत कार्यवाही करुन गु.र.क्र. २८२/२०१५ नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपींना अटक करण्यात आली असून ३३६ बनावट मद्याच्या बॉक्ससह रु. ३२,९४,८१०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

क) सीमावर्ती भागातून अवैधरित्या गोवा बनावटीचे मद्य वाहतूक प्रकरणी माहे

एप्रिल २०१५ पासून आतापर्यंत जिल्हयात एकूण ३४ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्यापैकी १९ गुन्हयात मा. न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अशा स्वरुपाच्या तस्करीवर पोलीस विभाग व राउशु विभाग यांच्या संयुक्तीने वारंवार पडताळणी केली जाते. मात्र मद्य तस्करी करणारी टोळी आढळून आली नाही.

(५) राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, कोल्हापूर तसेच पोलीस विभाग यांच्यामार्फत संयुक्तिपणे अवैध धंद्यास आळा बसण्यासाठी नियमितपणे गस्त घालण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान न मिळाल्याबाबत

**(३२) * ५०४७३ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.आर. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे सन.२०१३-१४ मधील ठिबक सिंचनचे अनुदान मागणीचे जवळपास ४००० शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,लातूर यांनी मंजूर केले असून सदरचा निधी नसल्याने अद्यापही संबंधित शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती सदर शेतक-यांना ठिबक सिंचनचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३)

लातूर जिल्हयात सन २०१३-१४ या वर्षाचे ८१७८ अर्ज प्राप्त झाले आहेत. उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत ३९०८ प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित अर्ज निकाली काढण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोनापूर (जि.गडचिरोली) येथील महाविद्यालयीन इमारतीच्या बांधकामात झालेली अनियमितता

**(३३) * ४६९८४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनापूर ( जि.गडचिरोली) येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत असलेल्या महाविद्यालयीन इमारतीच्या बांधकामात प्रचंड अनियमितता आढळून आल्याने, महाराष्ट्र कृषी संशोधन परिषदेने, दोन सदस्यीय चौकशी समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत सोनापूर, जिल्हा गडचिरोली येथील कृषि महाविद्यालयाच्या बांधकामाची प्रशासकीय व तांत्रिक बाबींची चौकशी करण्यासाठी दिनांक ३०/१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांची द्वीसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे.

(२) चौकशीची कार्यवाही सुरु असून समितीचा अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राखीव क्षेत्रात अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(३४) * ४५४९४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ६०२४२ हेक्टर क्षेत्र कायदयाने राखीव जंगल म्हणून सुचित केले असतानाही शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राखीव क्षेत्रात अनेक ठिकाणी विनापरवाना अवैध उत्खनन चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उत्खनन करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

(२) , (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हयात बेकायदा वाळू वाहतूक होत असल्याबाबत**

**(३५) * ४३७८४ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील बेकायदा वाळू वाहतूक होऊ नये म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी उपप्रादेशिक कार्यालयांना आदेश देऊनही वाळू वाहतूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊनही वाळु वाहतूकीस प्रतिबंध न करणाऱ्या उपप्रादेशिक कार्यालयातील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) दि. २७.११.२०१५ रोजी अपर जिल्हाधिकारी यांनी अहमदनगर जिल्हयातील गौण खनिज वाहतुक करणाऱ्या वाहनांविरुध्द कारवाई करण्यासाठी विळदघाट येथे चेकनाका तयार करुन पोलीस कर्मचारी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरिक्षक आणि महसूल कर्मचारी यांचे एकत्रित पथक तयार करुन तपासणी करण्याचे आदेश दिले होते.

(२) व (३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर अंतर्गत जानेवारी, २०१६ मध्ये गौण खनिज वाहतूक करणाऱ्या एकूण ३८ वाहनांवर कार्यवाही करुन रु.५,७७,४५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच एप्रिल २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीमध्ये गौण खनिज वाहणाऱ्या एकूण १०० वाहनांवर कार्यवाही करुन रु. १६,१६,५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. उपरोक्त सर्व वाहनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**फताटेवाडी, होटगी स्टेशन व आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) गावांच्या हद्दीत औष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारल्याबाबत**

**(३६) * ४५६६५ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फताटेवाडी, होटगी स्टेशन व आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) गावांच्या हद्दीत सुमारे २१०० एकर जमिनीवर एनटीपीसीचा औष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारला असून त्यासाठी जमिन सपाटीकरणाचे कंत्राट के.जे.इन्फ्रा कंपनीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने मोठया प्रमाणात मुरूम, वाळू व खडी या गौण खनिजाचे अवैध उत्खनन करून औष्णिक ऊर्जा प्रकल्पात वापरण्यात येत असल्याचे दिनांक २९ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, के.जे.इन्फ्रा कंपनीच्या वतीने सुरू असलेल्या कामावर तहसिलदार सोलापूर यांनी धाड टाकून मुरूम, वाळू आणि खडी या अवैध गौण खनीज उत्खननासाठी ३०९० कोटी रूपयांचा दंड लावण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याच एनटीपीसीच्या अन्य पाच कंपन्याच्या वतीने सुरू असलेल्या कामातही मोठया प्रमाणात अवैधरित्या गौण खनिजाचे वापर होत असल्यामुळे याही कंपन्याच्या विरोधात तहसिलदार, सोलापूर यांनी १ अब्ज १२ कोटी रूपये दंड आकारला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मोठया प्रमाणात गौण खनिजाचे अवैध उत्खनन करणाऱ्या कंपन्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून सदर

दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधिन ठिकाणी एन.टी.पी.सी. कंपनीने औष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारला असून, जमीन सपाटीकरण व इतर कामासाठी सदर कंपनीकडून विविध कंपन्यांना कंत्राट देण्यात आले आहेत.

(२) सदर प्रकल्पासाठी संबंधित कंपन्यांनी पूर्व परवानगी न घेता उत्खनन व वाहतूक केल्याचे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे.

(३) के.जे.इन्फ्रा कंपनीने विनापरवानगी केलेल्या उत्खननासाठी सुमारे रुपये ३०३९.९१ कोटी एवढ्या रकमेचा दंड आकारण्यासंबंधी तहसीलदार दक्षिण सोलापूर यांनी आदेश पारीत केले आहेत.

(४) सदर प्रकल्पासाठी गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन व वाहतुक केल्याप्रकरणी १६ अन्या कंपन्यांवरही सुमारे ११२.२७ कोटी एवढ्या रकमेचा दंड आकारण्यासंबंधी तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी आदेश पारीत केले आहेत.

(५) व (६) प्रस्तुत प्रकल्पाच्या कामासाठी संबंधित कंत्राटदार कंपन्यांनी विनापरवानगी उत्खनन व वाहतुक केल्याबाबत दंडात्मक रक्कम आकारण्यासंबंधी आदेश पारीत करण्यात आले आहेत.

सदर दंडाच्या आदेशाविरुध्द के.जे. इन्फ्रा.प्रा.लि. कंपनी वगळून इतर कंपन्यांनी उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. २ यांच्यासमोर अपील दाखल केले असून, सदर अपिलात उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार दक्षिण सोलापूर यांचे आदेश रद्द करुन, नव्याने दंडाची आकारणी करुन आदेश दिले आहेत. त्यानुसार दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच एन.टी.पी.सी. कंपनीस सदर रकमा संबंधित ठेकेदाराकडून वसूल करुन शासन जमा करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे. इन्फोनेट बीपीओ सर्व्हिसेस लिमिटेड कंपनीने मिटरमध्ये फेरफार करुन वीज चोरी केल्याबाबत

**(३७) * ४४४३६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगा इम्पोरिया बिल्डींग, विमान नगर, पुणे येथील मे. इन्फोनेट बीपीओ सर्व्हिसेस लिमिटेड कंपनीने वीज मिटरमध्ये फेरफार करुन १ लाख ३७ हजार ५६८ युनिटिची वीज चोरी केल्या प्रकरणी कंपनीच्या संचालक मंडळाविरुध्द दिनांक २८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास महावितरण कंपनीने गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महावितरणने या कंपनीला बिलावर लावलेला दंड व वीज चोरी केल्याप्रकरणी रुपये ३७ लाख ८१ हजार ९४५ व मूळ बिल वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदरील चौकशीच्या अनुषंगाने सत्र न्यायालय, पुणे यांच्या आदेशानुसार महावितरण कंपनीने सदर ग्राहकाकडून लावलेल्या दंडाची २५ टक्के रक्कम रु. ९,४५,५००/- भरुन घेण्यात आली आहे. तसेच सदर वीज चोरी प्रकरण न्यायप्रविष्ट असून संबंधित वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महापारेषणच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनी खालील फळबाग, आंबा, जांभूळ व इतर झाडे वाळून जात असल्याबाबत**

**(३८) * ३९७०९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापारेषण च्या ७६५ केव्ही अणुशक्तीच्या विद्युत वाहिनीच्या भुसावळ ते औरंगाबाद या भागातील तारांखालील जमिनीत व झाडावर वीज प्रवाह उतरत असल्याने ताराखालील फळबाग, आंबा, जांभूळ इत्यादीची झाडे वाळून जात असल्याने टॉवर खालील असलेल्या जमिनीत पेरणी करता येत नसल्याने शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापारेषण विद्युत कंपनीने इंडियन टेलिकायदा १८८५ व इलेक्ट्रीकसिटी कायदा २००३ च्या कलम ४८ च्या तरतुदी नुसार महाराष्ट्र

राज्याच्या महसूल विभागाकडून अथवा कंपनीकडून, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा. महसूल मंत्री व मा.उर्जामंत्री यांचेकडे दिनांक १० जानेवारी २०१६ रोजी निवेदनाद्वारे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महापारेषण कंपनीतर्फे ७६५ केव्ही भुसावळ - औरंगाबाद अशी कोणतीही वाहिनी उभारण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) होय

(४) सदर वाहिनी महापारेषण कंपनीकडून उभारण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे देवसरी (ता. उमरखेड, जि.यवतमाळ) येथे अतिवृष्टी व पुराने बाधीत झालेल्या गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३९) * ४६३४८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवसरी (ता. उमरखेड, जि.यवतमाळ) येथे अतिवृष्टी व पुराने बाधीत झालेल्या गावाचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव अप्पर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेमार्फत शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाच्या पुनर्वसनासाठी मौजा आंबवन (ता. उमरखेड) येथील जागा निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसनाच्या कामासाठी लागणारे अंदाजित रुपये १६८० लाख इतका निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुनर्वसनाचे काम त्वरीत सुरु करुन ते पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी त्यांच्या दिनांक १६.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मौजे देवसरी या गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे सादर केला आहे. परंतु प्रस्ताव परीपुर्ण नसल्याने विभागीय आयुक्त, अमरावती यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडुन आवश्यक ती अधिकची माहिती मागवली आहे.
(२), (३) , (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वर्सोवा (मुंबई) परिसरातील उद्यानासाठी राखीव असलेला भूखंड नाटयसंस्थेस दिल्याबाबत**

**(४०) * ४४५८४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एका बॉलीवूड अभिनेत्रीच्या नाटयसंस्थेस नाटयविहार केंद्रासाठी (मुंबई) वर्सोवा परिसरातील ओशिवरा येथील उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेवरील २००० चौरस मीटरचा भूखंड अवघ्या ७० हजार रूपयात महसूल विभागाने दिलेला असल्याची माहिती दिनांक २९ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याच अभिनेत्रीच्या नाटयसंस्थेस यापूर्वी दिनांक ४ एप्रिल १९९७ रोजी वा त्यासुमारास अंधेरी तालुक्यातील मौजे वर्सोवा येथील भूखंड नाममात्र दराने देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भुखंड परत घेण्याबाबत व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) मौ. वर्सोवा येथील स.नं. १६१ लगतच्या अभिन्यास क्रमांक १ मधील भूखंड क्रमांक ७ (क्षेत्रफळ १७४१.८९ चौ.मी.) नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट या सांस्कृतिक संस्थेला काही अटी व शर्तींना अधीन राहून मंजूर करण्याचा शासनाने तत्वत: निर्णय १९९६ साली घेतला होता व आगावू ताबाही दिला होता. तथापि, सदर भूखंडापैकी काही भाग सीआरझेडने बाधीत झाल्यामुळे सदर संस्थेस त्यावर बांधकाम करता आलेले नाही. त्यामुळे पर्यायी भूखंडाची मागणी नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट या संस्थेकडून प्राप्त झाली होती.

तद् नंतर मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील सर्वे क्र. १०९अे/१, न. भू. क्र. ३ (पै) २००० चौ.मी. क्षेत्रावरील "उद्यान" हे आरक्षण वगळून सदर क्षेत्र ,शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टीपीबी-४३०७/१३६६/सीआर-३०४/ २००७/नवि-११, दिनांक ३०/७/२०१० अन्वये "नाटयविहार कला केंद्रा" करिता आरक्षित करण्यात आले. त्यानुषंगाने नाट्यविहार कला केंद्रासाठी वरीलप्रमाणे आरक्षित असलेला २००० चौ.मी. क्षेत्राचा वर उल्लेखित भूखंड शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ८.२.१९८३ आणि दिनांक ११.५.१९८४ अन्वये निश्चित केलेल्या प्रचलित धोरणानुसार दि. १/२/१९७६ रोजीच्या मुल्यांकनाच्या २५% इतकी कब्जेहक्काची रक्कम आकारुन, पूर्वी आगावू ताबा दिलेला भूखंड परत घेण्याच्या व अन्य काही अटी / शर्तीवर शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २३/१२/२०१५ अन्वये नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट या संस्थेला मंजूर करण्यात आला आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने प्रश्नांकीत २००० चौ.मी. जमिनीचे दिनांक १.२.१९७६ चे मूल्यांकन ठरविण्याची कार्यवाही सुरू असून अद्याप अंतिम मूल्यांकन निश्चित व्हावयाचे आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**काटेवाडी (तारळे) (ता.पाटण) येथील स्थानिकांनी खडीक्रशर सुरु केल्याबाबत**

**(४१) * ४११५२ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटेवाडी (तारळे) (ता.पाटण) येथील स्थानिक लोकांनी गावाच्या हद्दीतील डोंगरात खडीक्रशर सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडीक्रशर सुरु करणेकरीता सदरच्या डोंगरातील जागेचे खरेदीपत्र केवळ १० गुंठे एवढेच केले असताना या खडीक्रशरचा बेकायदेशीर विस्तार सुमारे एक एकर क्षेत्रात केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडीक्रशरच्या वरच्या बाजूस प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत कोंजवडे ते बेंदवाडी हा रस्ता करण्यात आला असून या खडीक्रशरचे क्षेत्र रस्त्याला लागून आत गेल्याने या रस्त्यास या खडीक्रशरमुळे धोका निर्माण झाला असून सदरचे खडीक्रशर असेच सुरु राहिले तर हा रस्ता मधेच खचून जाईल अशी भिती बेंदवाडी ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खडीक्रशर तातडीने बंद करावे अशी मागणी बेंदवाडी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खडीक्रशर बंद करण्याबाबत व बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांविरुद शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिनांक २८/११/२०११ च्या आदेशान्वये मौजे काटेवाडी (ता. पाटण) येथील गट नं. २२/४ मधील ०.४० हे. आर क्षेत्रावर ५ वर्षे कालावधीसाठी खाणपट्टा मंजूर केला असून, त्यानुसार सदर ठिकाणी खाणपट्टा धारकाचे खडीक्रशर सुरु आहे.

(३) होय.

(४) बेंदवाडी परिसरातील ग्रामस्थांनी सदर खडीक्रशर बंद करण्याबाबतची मागणी मंडळ अधिकारी तारळे यांच्याकडे केली आहे.

(५) व (६) कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सातारा यांनी कोजवडे ते माळवाडी बेंदवाडी रस्त्यास धोका

असल्याबाबत सादर केलेल्या अहवालानुसार, अपर जिल्हाधिकारी सातारा यांनी दिनांक २९/०२/२०१६ च्या आदेशान्वये सदर रस्त्यालगत होत असलेले उत्खनन बंद करण्याचे आदेश खाणपट्टाधारकास दिले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील बेंबळा नदीच्या पात्रातून अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत**

**(४२) * ४३२०८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील चोर माहुली ते धामकपर्यंत बेंबळा नदीच्या पात्रातून अवैध वाळूचे उत्खनन करुन मोठ्या प्रमाणात तस्करी केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) माहे डिसेंबर, २०१५ मध्ये व त्यादरम्यान नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील बंबळा नदीपात्रातील वाळूच्या अवैध उत्खनन/ वाहतुकीबाबत एकूण ५ प्रकरणांत दंडात्मक कारवाई करुन रु. १,१३,५००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील शिरना नदी, कोंढा नाला, चालबर्डी नाला, पळसगांव व वर्धा नदीच्या घाटावरून अवैधरित्या रेतीचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(४३) * ५०१५६ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील शिरना नदी, कोंढा नाला, चालबर्डी नाला, पळसगांव व वर्धा नदीच्या घाटावरून मागील दोन महिन्यापासून अवैधरित्या रेती उत्खनन होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या रेती उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन भागात वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पतीस आली आहेत. तथापि चंद्रपूर जिल्हयात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर, उपविभागस्तरावर व तालुकास्तरावर दक्षता पथके गठीत करण्यात आली आहेत. तसेच पोलीस विभागासही गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी गस्त घालण्याच्या सुचना दिल्या आहेत. सदर दक्षता पथकांमार्फत केलेल्या कारवाईत चंद्रपूर जिल्हयातील शिरना नदी, कोंढा नाला, चालबर्डी नाला, पळसगांव व वर्धा नदीपात्रातून मागील २ महिन्यात वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतुकीच्या ३७ प्रकरणांत रु. ३,४४,१००/- एवढी दंडाची रक्कम वसूल केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिराळा, कडेगाव (जि.सांगली) तालुक्यातील गावे मदतीपासून वंचित असल्याबाबत

**(४४) * ४८५४१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त ३६३ गावातील शेतकऱ्यांना यंदाच्या हंगामातील नुकसानीबाबत राज्य शासनाने ज्या गावातील पैसेवारी ५० पैशाहून कमी आहे अशा गावातील शेतकऱ्यांना ७० कोटीची मदत दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टंचाईग्रस्त गावाच्या यादीमध्ये शिराळा तालुक्यातील ४५ आणि कडेगाव तालुक्यातील १७ गावांचा नव्याने समावेश करुनही ही गावे अद्यापही मदतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर गावांना नुकसान भरपाई तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

सांगली जिल्ह्यासाठी रु. ६९.९१ कोटी इतका निधी दिला आहे.

सन २०१५ च्या खरीप हंगामा १५,७४७ गावामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे. दि. ३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्याचे निकष जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार दुष्काळ जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पिक नुसान झालेल्या औरंगाबाद, अमरावती नागपूर व नाशिक विभागातील कापूस पिकासाठी, नागपूर व अमरावती विभागातील सोयाबीन पिकासाठी पीक विमा योजनेची मंडळ निहाय मदत जाहीर झाल्यानंतर विमा काढलेल्या सर्व शेतक-यांना पीक योजनेनुसार मदत देण्यात येईल व ज्या शेतक-यांनी विमा उतरवलेला नाही, अशा शेतक-यांना पीक विमा योजनेची मंडळनिहाय जाहीर केलेल्या रकमेच्या ५०% रक्कम शासनाकडून देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खान्देशातील धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भागात अवैध दारुची विक्री होत असल्याबाबत

**(४५) * ४९६८९ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशातील धुळे व नंदुरबार जिल्ह्यात विशेषत: आदिवासी भागातील प्रत्येक खेडयात दारूची विक्री होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट व अतिदारु सेवन केल्याने दर महिन्याला किमान २० ते २५ जणांचा मृत्यू झाल्याच्या प्रत्येक जिल्ह्यात नोंदी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल मंडळ भागातील मध्यवर्ती किंवा मोठ्या आठवडेबाजार असलेल्या गावाला अधिकृत दारु विक्री किरकोळ परवाना देण्याबाबत तसेच अवैध दारु विक्री बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही तथापि, नंदुरबार जिल्हयात दारुच्या अतिसेवनामुळे फेब्रुवारी,२०१६ मध्ये एक व्यक्तीचा मृत झाला असल्याची नोंद आहे.धुळे जिल्हयात असे मृत झाल्याची नोंद नाही.

(३) शासनाचे देशी दारु किरकोळ विक्री दुकान (सीएल-३ अनुज्ञप्ती) व बंद बाटलीतून देशी विदेशी दारु विक्री दुकान (एफएल-२ अनुज्ञप्ती) मंजूरी देण्यास निर्बंध आहेत. अवैध मद्य निर्मिती व विक्री विरोधात नियमित गस्त घालून कारवाई करण्यात येते त्यानुसार अवैध दारु प्रकरणी धुळे जिल्हयात माहे एप्रिल २०१५ ते माहे जानेवारी २०१६ या कालावधीत एकूण ७३९ गुन्हे नोंदविले असून नंदूरबार जिल्हयात एकूण ४४८ गुन्हे नोंदविले असून त्या १३१ वारस गुन्हे नोंद केले आहेत. मुंबई दारुबंदी कायदा अंतर्गत कलम ९३ अन्वये अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, धुळे कार्यालयाने २ व्यक्तींविरुध्द कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बेळवंडी (ता.श्रीगोंदा) येथील शेती महामंहामंडळाची जमीन खाजगी कंपनीला देण्याचा घेतलेला निर्णय**

**(४६) * ४३८९२ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळवंडी (ता.श्रीगोंदा) येथील शेती महामंहाडळाची सुमारे १२०० एकर जमीन प्रचलित नियम डावलून एका बडया कंपनीला देण्याचा निर्णय घेतल्याच्या निषेधार्थ शेती बचाव कृति समितीचे अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली बेलवंडी येथील शेतीमळा कार्यालयासमोर दि. २४/३/२०१५ रोजी वा त्यासुमारास धरणे धरण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदन जमीन शेतकऱ्यांना शेती कसण्यासाठी देण्यात यावी अशी त्या भागातील शेतकऱ्यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त जमीन शेतकऱ्यांना कसण्यास देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची बेलवंडी मळयातील खंडक-यांना वाटून शिल्लक राहिलेली एकूण १३१७ एकर जमीन संयुक्त शेती करीता कराराने देण्यासाठी नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून मे. श्रीकृष्णा इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांची निवड करुन त्यांच्यासोबत संयुक्त शेतीसाठी करारनामा करण्यात आला आहे. श्री. राजेंद्र काकडे यांनी दिनांक २३/३/२०१५ रोजी सदर करार रद्द करण्याची मागणी करुन आंदोलन करण्याची नोटीस दिली होती. तथापि, संयुक्त शेतीबाबतचा करारनामा श्री. काकडे यांच्या निदर्शनास आणल्यावर त्यांनी आंदोलन स्थगित केले.

(४) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील वेगवेगळया मळयातील जमिनी संयुक्त शेती पध्दतीने वापरण्याची महामंडळाची भूमिका आहे. संयुक्त शेती पध्दतीसाठी महामंडळाकडून हाती घेण्यात येणा-या निविदा प्रक्रियेत शेतकऱ्यांनाही भाग घेण्याची मुभा आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विटा (जि.सांगली) येथील भैरवनाथ यात्रा समितीच्या जागेची बेकायदेशीर विक्री केल्याबाबत**

**(४७) * ४५३३६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथील भैरवनाथ यात्रा समितीच्या तालमीची गट नं.४४५/१/४ मधील जागेची बेकायदेशीर विक्री केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भैरवनाथ यात्रा समितीच्या जागेची विक्री केल्याप्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) कसबे विटा, (ता.खानापूर, जि.सांगली) येथील गट नं.४४५/१/४ मधील ०.०४आर खाजगी जमीन भैरवनाथ यात्रा समितीचे अध्यक्ष कै. हणमंत यशवंत पाटील यांच्या नावे १९७३ साली बक्षिपत्राने करण्यात आली होती. सदर समितीचे अध्यक्ष बदलल्यानंतर उक्त जमीन भैरवनाथ यात्रा समितीचे अध्यक्ष श्री. सदाशिव हणमंतराव पाटील यांचे नावे दाखल झाली. सदरची मिळकत श्री. सदाशिव हणमंतराव पाटील यांच्याकडून खरेदीखताने दि. २५/१०/२०१३ रोजी श्री. संदीप माधवराव पाटील यांनी खरेदी घेतली. तथापि सदर खरेदीखत खरेदीदार श्री पाटील यांनी स्वेच्छेने नोव्हेंबर २०१४ मध्ये रद्द केल्याने उक्त मिळकत पुनश्च श्री. सदाशिव हणमंतराव पाटील अध्यक्ष, भैरवनाथ यात्रा समिती यांच्या नावे दर्शविण्यात आली आहे.

सदरहू जमीन शासकीय नाही तसेच तिच्या हस्तांतरणावर निर्बंध नसल्याने खरेदी विक्रीबद्दल शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यात अनधिकृतपणे वीटभट्या सुरु असल्याबाबत**

**(४८) * ३९७८६ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील ७९ पैकी निम्माहून अधिक गावांमध्ये अनधिकृतपणे वीटभट्ट्या सर्रासपणे सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात अनधिकृत विटभट्ट्या सुरु असून केवळ एकाच वीटभट्टीची परवानगीची नोंद महसूल दप्तरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विटभट्टयांची नोंद महसूल दप्तरी नसल्यामुळे लाखो रुपयाचा शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) मुक्ताईनगर तालुक्यातील ७९ गावांत एकूण १८ वीटभट्ट्या असून २ चिमणी विटभट्ट्या व १६ वीटभट्ट्या आहेत. त्यापैकी १ चिमणी विटभट्टी व १६ वीटभट्ट्या विनापरवानगी सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर चिमणी वीटभट्टीधारकाने ४५० ब्रास मातीचे विनापरवानगी उत्खन व वाहतूक करुन साठा केल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावर रुपये १४,५९,९७०/- एवढ्या रकमेची दंडाची नोटीस बजावयात आली आहे.

तसेच उपरोक्त १६ वीटभट्टी चालकांकडून परवानगीचे अर्ज प्राप्त झाले असून, सदर अर्जाची चौकशी सुरु आहे. सदर १६ वीटभट्टीचालकांपैकी ८ वीटभट्टीचालकांकडून अनधिकृत अकृषक वापरापोटी रुपये ५०,०००/- इतक्या दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित विटभट्टीधारकांवर दंडात्मक कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

तसेच, कुंभार समाजाव्यतिरीक्त इतर वीटभट्टीधारकाकडून गौणखनिजाचे अनधिकृतरीत्या उत्खनन केल्याबाबत रुपये ४०,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुपा-पारनेर (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील जमिनीच्या भुसंपादनात झालेला गैरव्यवहार

**(४९) * ४३४८८ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात औद्योगिक कारणासाठी दिंडोरी तालुक्यातील तळेगाव अक्राळे व अहमदनगर विभागातील सुपा-पारनेरमधील जमिनीत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची तक्रार केली असता सदर तक्रारीवर अपर जिल्हाधिकारी यांनी चौकशी सुरु केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन गैरव्यवहाराची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) अतिरिक्त दिंडोरी औद्योगिक क्षेत्रातील मौजे तळेगाव व मौजे अक्राळे, जि.नाशिक व सुपा-पारनेर जिल्हा अहमदनगर या औद्योगिक क्षेत्रातील जमिनीत गैरव्यवहार झाल्यासंबंधी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अनुक्रमे अपर जिल्हाधिकारी, नाशिक व अपर जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडे चौकशीचे काम सुरु आहे. चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीराम शिक्षण संस्थेने (ता.माळशिरस, जि.सोलापूर) बिगर शेती गटांमध्ये अटी व शर्तीचे केलेले उल्लंघन

**(५०) * ३९८७९ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीराम शिक्षण संस्था पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील संस्थापक व सचिव यांनी केलेल्या बिगर शेती गटांमध्ये ७/१२ बोगस करुन अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी सोलापूर तसेच शासनाकडे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) व (३) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग यांच्याकडे चौकशीची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात वडाप व खाजगी वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन सेवा तोटयात असल्याबाबत

**(५१) * ४५३९८ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात वडाप आणि खाजगी वाहतुकीमुळे एस.टी. वाहतुक सेवा तोटयात चालली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडापमुळे एस.टी. स्टँड परिसरात वाहतुकीची कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती महाराष्ट्र परिवहन सेवा तोटयात येवू नये व वाहतुकीची कोंडी होवू नये म्हणून वडापसह खाजगी नागरिक वाहतुकीवर निर्बंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.
(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहने उभी करण्यात येऊ नये, असे आदेश पारित करण्यात आलेले असून सदर आदेशाच्या अनुषंगाने सर्व आगारांच्या व बसस्थानकांच्या परिसरात २०० मीटर “नो पार्किंग झोन” चे फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच आगार कार्यक्षेत्रातून होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे प्रकार व वाहन

क्रमांक यांची दैनंदिन माहिती संबंधित पोलीस ठाणे यांना पत्राद्वारे देण्याची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाद्वारा करण्यात येते.

तसेच अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरीता शासनाने दिनांक १४.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापुर जिल्ह्यात ॲनॉलॉग सिंग्नल बंद करण्यात आल्यामुळे केबल प्रक्षेपण बंद झाल्याबाबत**

**(५२) * ४००४८ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यात ॲनॉलॉग सिंग्नल बंद करण्यात आल्यामुळे ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री पासून केबल प्रक्षेपण बंद झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला अनुसरून सेट टॉप बॉक्स लावण्याची सक्ती असल्यामुळे केबल चालकांकडून अवाजवी दराने सेट टॉप बॉक्सची विक्री करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेट टॉप बॉक्स लावल्यानंतर चॅनल्स निवडण्याचे स्वातंत्र्य असतानाही ग्राहकांकडून दरमहा ३०० रूपये भाडे आकारणी करण्यात येत असून अनावश्यक चॅनल्सची सुध्दा सक्ती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केबल चालकांनी ग्राहकांची संख्या अत्यंत कमी दाखवली असून शासनाच्या महसूलात सुध्दा मोठी घट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्राहकांची पिळवणूक थांबविण्यासाठी केबल चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी भागात सेट टॉप बॉक्स बसविण्यात न आल्यामुळे दि. ३१ डिसेंबर, २०१५ च्या मध्यरात्री पासून ॲनॉलॉग सिग्नल यंत्रणा बंद करण्यात आली होती. तथापि, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई तसेच औरंगाबाद खंडपीठात या बाबतीत दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. ०४/०१/२०१६ व दि. १३/०१/२०१६ रोजी दिलेल्या आदेशांस अनुसरुन सदरची ॲनॉलॉग सिग्नल यंत्रणा पूर्ववत चालू करण्यात आलेली आहे.

(२) व (३) अश्या स्वरुपाच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) दि. २६/०३/२०१५ च्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक व बहुविध यंत्रणा परिचालक यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते. सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित केबल जोडण्यांपेक्षा जस्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुध्द महाराष्ट्र करमणूक शूल्क अधिनियमातील विहीत तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते. याशिवाय, सदर अधिनियमातील कलम ५ मध्ये सुधारणा करुन करमणूक शूल्क चुकवेगिरीच्या प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागात बनावट नावाने नोकरी मिळविल्याबाबत**

**(५३) * ४९५५२ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : तारांकित प्रश्न क्रमांक ३०५९६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागामध्ये सन १९९६ ते २००५ या कालावधीत अनुकंपा तत्वावर बनावट नावाने नोकरी मिळविल्याची प्रकरणे निदर्शनास आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशीअंती त्यापैकी ८ उमेदवारास निलंबित केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन सेवेत असलेल्या व याप्रकरणात जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांच्याविरूध्द राज्य परिवहन महामंडळाने कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन सेवेत असलेल्या व याप्रकरणात जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४) सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या ०८ उमेदवारांना दि.२३.०९.२०१५ पासून निलंबित केले असून दि.२८.०९.२०१५ रोजी आरोपपत्र देण्यात आले आहे. तसेच १० जबाबदार अधिकाऱ्यांपैकी ६ अधिकारी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचेवर कारवाई करता आली नाही. उर्वरित ४ जबाबदार अधिकाऱ्यांपैकी २ अधिकाऱ्यांवर आरोपपत्र बजावण्यात आले आहे. २ अधिकाऱ्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विरोधात क्रांती चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे प्रथम खबर क्रमांक १०८५ ते १०९२ नुसार दि. ०५.१२.२०१५ व दि. ०६.१२.२०१५ रोजी भा.द.वि.कलम ४२०, ४६८, ४७१ व ३४ अन्वये रितसर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर -लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शेतक-यांना कृषी पंपाचे कनेक्शन न मिळाल्याबाबत

**(५४) * ४७७३७ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर - लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील येथील शेतक-यांनी कृषी पंपाचे कनेक्शन मिळण्याकरिता महावितरणाकडे सन २०११ पासून अर्ज करुन असलेली विहित रक्कम भरणा करुनही अदयापी कनेक्शन मिळाले नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांनी विहित रक्कम भरणा करुनही कृषी पंपाचे कनेक्श्न न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) लांजा व राजापूर तालुक्यातील कृषी पंपाची कनेक्शन देण्यासाठी वारंवार केलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यावर तोडगा काढण्यासाठी पार्शिअल टर्नकी बेसीससाठी निविदा काढण्यात आली. त्यास प्रतिसाद मिळाला परंतु ठेकेदारांना निर्धारीत दर परवडत नसल्याने ठेकेदारांनी निर्धारीत दरापेक्षा जास्त दराने निविदा भरल्या. महावितरण कंपनीने निर्धारीत दरापेक्षा १५% दरापर्यत कामे करण्यास दिनांक १९.८.२०१५ रोजी परवानगी दिली. त्यानंतर दिनांक २०.८.२०१५ रोजी ठेकेदाराला काम करण्याचे आदेश देण्यात आले व वीज कनेक्शन देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) येथील यंत्रमागाचे वीजदर प्रतियुनीट दीड रुपये आकारण्याबाबत

**(५५) * ४२७४५ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथे सुमारे ९ लाख यंत्रमाग असून वाढत्या वीजदरामुळे यंत्रमाग व्यवसायिक व कामगार अडचणीत आले आहेत व त्यामुळे हा व्यवसाय वाचविण्यासाठी यंत्रमागाचे वीजदर प्रति युनीट दीड रुपये आकारण्यात यावे अशी मागणी येथील यंत्रमागधारकांनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी येथील यंत्रमागधारकांना वीजदर प्रती युनीट दीड रुपया करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) यासंदर्भात निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बहुवार्षिक वीजदर दि. २६.०६.२०१५ च्या आदेशानुसार २७ अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमाग धारकांच्या वीजदरात वाढ करण्यात आली होती. शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन दिनांक ७.११.२०१५ च्या शासन निर्णय व दिनांक ३.१२.२०१५ च्या शुध्दीपत्रकान्वये यंत्रमागधारकांचे पुर्वीचे अनुदान कायम ठेवून रु. २.६६ प्रति युनिट हे सवलतीचे दर लागू करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील अर्ली गावातील भोई समाजाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(५६) * ४६५९६ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैनगंगा (ता. केळापूर) नदीच्या काठावर वसलेल्या अर्ली गावातील भोई समाजाच्या १७ कुटूंबांची सन २००६ साली घरे वाहून गेल्याचे आज पावेतो संबंधित बाधितांना शासनाकडून घरे वा जागा देखील उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाधितांना ११ वर्षापूर्वी शासनाकडून मदत करणेबाबत आश्वासित केले होते तसेच संबंधित बाधितांना मदत मिळण्याच्या हेतूने जिल्हा प्रशासनाने अहवाल शासनास सादर केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती अहवालानुसार शासनाकडून मदत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) बाधीत कुटूंबाच्या पुनर्वसनासाठी तयार करण्यात आलेल्या अभिन्यासाला सहाय्यक संचालक नगर रचना, यवतमाळ यांचेकडून मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रामटेक, मौदा (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे तूरमुरा व करपा रोगाने झालेले नुकसान**

**(५७) * ४५५५९ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक, मौदा (ता.पारशिवनी, जि. नागपूर) येथील शेतकऱ्यांच्या सोयाबीन व धान पिकावर तूरमुरा व करपा रोग झाल्याने पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याने त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर २०१५ च्या पहिल्या आठवड्यात व त्यादरम्यान मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) नागपूर जिल्ह्यातील मौदा व पारशिवनी तालुक्यातील धान व सोयाबिन पिकाचे रोग व किडीच्या प्रादुर्भावामुळे ८८४३ हेक्टर क्षेत्राचे ३३% पेक्षा अधिक नुकसान झाल्याचे अहवाल प्राप्त आहे. प्राप्त अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद (जि.पालघर) महामार्ग लगत आदिवासींच्या जमिनी खरेदी-विक्रीत झालेला गैरव्यवहार**

**(५८) * ४८६६६ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद (जि.पालघर) महामार्ग क्र. ८ लगत चिल्हराफाटा, चारोटी, कासा, आंबोली, तलासरी, अच्छाड भागात भूमाफिया सर्रासपणे आदिवासींच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तलाठी, तहसिलदार, प्रांत, जिल्हाधिकारी, आदिवासी विकास विभागाचे अधिकारी व नगररचना विभाग अधिकारी यांच्या निदर्शनास येवूनही सदर प्रकरणी कोणतीही कारवाई करीत नसल्याचे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भूमाफिया व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील रस्त्यांवर जुन्या, जिर्ण झालेल्या परिवहन महामंडळाच्या बसेस धावत असल्याबाबत**

**(५९) * ४८३९० ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती ) येथील जुन्या व जीर्ण झालेल्या परिवहन महामंडळाच्या बसेस चालविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखलदरा व धारणी हे दोन्ही तालुके डोंगराळ व आदिवासीबहुल असुन या ठिकाणचे रस्ते घाटवळणाचे असल्याने दुरवस्थेतील गाडयामुळे प्रवाशांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नवीन बसेस पुरविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) मेळघाट (चिखलदरा व धारणी) हा भाग परतवाडा आगाराचे कार्यकक्षेत येत असुन परतवाडा आगारास सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ (जानेवारी २०१६ पर्यंत) अनुक्रमे ०५,०२ व ०६ इतक्या नविन बसेस देण्यात आलेल्या आहेत म्हणजेच गेल्या तीन वर्षामध्ये एकूण १३ नविन बसेस परतवाडा आगारास देण्यात आलेल्या आहेत
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अवसरी खुर्द (ता.आंबेगांव, जि.पुणे) येथे मुरुमाखाली तलाठ्याला दुचाकीसह गाडण्याचा केलेला प्रयत्न**

**(६०) * ४२६७३ श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अवसरी खुर्द (ता.आंबेगांव,जि.पुणे) येथे मुरुमाची अनधिकृतपणे वाहतूक करणाऱ्या ट्रँक्टर चालकांने ट्रॅक्टर ट्रॉलीतील मुरुमाखाली तलाठीला दुचाकी असलेल्या बुलेटगाडीसह गाडण्याचा प्रयत्न केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ट्रॅक्टर चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) व (३) प्रश्नाधिन प्रकरणी पोलीस स्टेशन मंचर येथे संबंधित ट्रॅक्टर चालक व ट्रॅक्टर मालक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हातील शेतकरी ठिंबक सिंचन अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(६१) * ५०००४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात सन २०१३-१४ व २०१४-१५ ठिबक सिंचन योजनेत ऑनलाईन अर्ज केलेले ३४४७ शेतकऱ्यांना अद्यापर्यंत ठिबक सिंचन अनुदान मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये ऑनलाईन नोंदणी झालेले १० हजार शेतकऱ्यांसह जिल्हयातील सुमारे १३ हजार ५०० शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेतील अुनदान वितरित करण्याकरिता २८ कोटी रुपयांची मागणी जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालयाने शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील ठिबक सिंचन योजनेतील शेतकऱ्यांना तातडीने अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३)

जालना जिल्ह्यातसन २०१३-१४ या वर्षाचे ९४३६ अर्ज प्राप्त झाले आहेत. उपलब्ध अनुदान रु. २९.१९ कोटींमधून ७००७ प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरीत प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.

सन २०१४-१५ मध्ये ९११५ अर्ज प्राप्त झाले होते. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी व त्याप्रमाणात राज्य हिस्सा मिळून जालना जिल्ह्यासाठी रु.२०.६२ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला, सदर निधीतून ६८०५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

जालना जिल्ह्यात ऑनलाईन द्वारे सन २०१५-१६ मध्ये ११३२८ अर्ज प्राप्त झाले आहेत. केंद्र शासनाकडून पहिल्या हप्त्यापोटी प्राप्त झालेला निधी व त्याप्रमाणात राज्य हिश्श्याचा निधी मिळून रु. ५.६६ कोटी एवढा निधी उपलबध करुन देण्यात आला आहे. सदर निधीच्या मर्यादेत प्राथम्यक्रमानुसार पुर्व संमती देवून अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मृत्यूमुखी पडणाऱ्या खलाशांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(६२) * ४०५८५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रात मासेमारी करताना मृत्यू झाल्यास खलाशांच्या कुटुंबियांना शासनाच्या मच्छीमार संकट निवारण निधी योजनेतून १ लाख रूपयांची मदत केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या शासन परिपत्रकातील एका मुद्याचा जसाचा तसा अर्थ लावल्यामुळे मासेमारी करून परत येताना किंवा जेटीवर मासे उतरविताना पडून मृत्यू झाला तर त्या खलाशांच्या कुटुंबियांना मदत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षभरात ४ कुटुंबियांचे प्रस्ताव सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त, रत्नागिरी यांचे कार्यालयाकडून फेटाळण्यात आल्याने ही कुटुंबे मदतीपासून वंचित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पिडित कुटुंबियांना संकट निवारण निधीतून मदत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) होय.

(५) प्रत्यक्ष मासेमारी करतांना अपघाती मृत्यू झाला नसल्याने अर्थसहाय्य अनुज्ञेय नसल्याचे कळविण्यात आले आहे. तथापि, सदर ४ प्रस्तावापैकी तीन प्रस्ताव मृत मच्छिमारांच्या वारसदारांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी, राष्ट्रीय मत्स्यजिवी सहकारी संघ नवी दिल्ली (FISHCOPFED) यांचेकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुसवडे तुसे (ता.वाडा, जि.पालघर) या ठिकाणी पुनर्वसन करण्यात आलेल्या कोयना धरण प्रकल्पग्रस्त रहिवाशांच्या मागण्यांबाबत

**(६३) * ४८३५८ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कुसवडे तुसे (ता.वाडा, जि.पालघर) या ठिकाणी पुनर्वसन करण्यात आलेल्या कोयना धरण प्रकल्पग्रस्त रहिवाशांनी आपल्या न्याय मागण्यासाठी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेधासाठी उपोषण करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ४५ वर्षापासून येथील रहिवाशांना शेतीसाठी जमिन, घरासाठी भूखंड आर्थिक सहाय्य तसेच आवश्यक त्या नागरी सोईसुविधाही देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसन वसाहतीकरीता स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर करणे, गावातील पाणीपुरवठा, रस्ते, बांधणे, एस.टी. थांबा, गटारे तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असलेल्यांना शासकीय नोकरीत सामावून घेणे इ. महत्वाच्या मागण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे सोबत २ वेळा बैठका होऊनही या प्रकरणी कोणताही निश्चित ठोस निर्णय झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे कुसवडे (तुसे) येथील रहिवाशांनी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी एक दिवसांचे उपोषण केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मौजे कुसवाडे (तुसे) येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याकरिता पुरेशी लोकसंख्या नाही. प्रकल्पग्रस्तांना पायाभूत नागरी सुविधा देण्यात आल्या असून, उर्वरित नागरी सुविधा देण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सामान्य प्राशासन विभागाच्या दिनांक २७.१०.२००९ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका त्यांची सेवाप्रवेश अर्हता तपासून, सेवाप्रवेश नियमानुसार जाहिराती देऊन स्पर्धा परीक्षेद्वारे व गुणवत्तेनुसार करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत बांधण्यात आलेल्या शेततळयांचे कोट्यवधी रुपयांचे अनुदान न मिळाल्याबाबत

**(६४) * ४५७७५१ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमाच्या राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत बांधण्यात आलेल्या सामुहिक शेततळयांचे कोटयवधी रुपयांचे अनुदान शासन पातळीवर थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून अहमदनगर जिल्हयात एकाही शेततळ्यास कृषी विभागाने परवानगी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेततळ्याचे अनुदान शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अहमदनगर जिल्ह्याकरीता सन २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सामुहिक शेततळे घटकाकरीता भौतिक १७८ व आर्थिक रु.५२६.५५ लाख आणि राष्ट्रीय कृषि विकस योजनेंतर्गत भौतिक ९९० व आर्थिक रु.२२४०.२२ लाख इतका लक्षांक देण्यात आला होता. तसेच सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सामुहिक शेततळे घटकाकरीता भौतिक १४७ व आर्थिक रु. ३७७.८७ लाख आणि राष्ट्रीय कृषि विकास योजनंतर्गत भौतिक १०१६ व आर्थिक रु. १९७७.९५ लाख इतका लक्षांक देण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील अँटॉप हिल भागातील कामराजनगर परवानगी न घेता इंग्रजी माध्यमाची शाळा अनधिकृतपणे बांधण्यात आल्याबाबत

**(६५) * ५०३३३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अँटॉप हिल भागातील कामराजनगर झोपडपट्टी परिसरात शासकीय जमिनीवर गत चार वर्षापासून शासनाची कोणतीही परवानगी न घेता इंग्रजी माध्यमाची शाळा अनधिकृतपणे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदर अनधिकृत शाळेला नोटीस देवून शाळेचा दुसरा मजला तोडण्यात येऊनही परत मजल्याची दुरुस्ती करुन अनधिकृतपणे शाळा चालविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत शाळेच्या बांधकाम करणाऱ्या संबंधितांविरुध्द व शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकाम केलेल्या शाळेचे निष्कासित करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मुंबई येथील अँटाप हिल भागातील कामराजनगर झोपडपट्टी परिसरात अनधिकृतपणे बांधलेल्या शाळेचे १४ फुटापेक्षा वरील बांधकाम दि. ०७.०३.२०१६ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातल्या झोपडपट्ट्यांसह ग्रामीण भागात बेकायदा दारु विक्री सुरु असल्याबाबत

**(६६) * ४६४३९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातल्या झोपडपट्ट्यांसह ग्रामीण भागात बेकायदा दारु विक्री सुरु असल्याचे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरालगतच्या तसेच ग्रामीण भागातील, महामार्गांवरील ढाब्यांवर व काही हॉटेल्समध्ये विदेशी मद्यांच्या नावाने बनावट मद्याची विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच संबंधित कंपन्यांची अशी बनावट दारु तपासण्याची स्वतंत्र व्यवस्था असल्याचे कारण राज्य उत्पादन विभागाच्या अधिकारी यांचे कडून देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५)असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) होय,

(३) नाही.

(४) व (५) पुणे जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात बेकायदा/अवैध दारु विक्री व वाहतूक अथवा निर्मिती केल्याबाबत, माहे जानेवारी २०१६ मध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमा अंतर्गत एकूण २७८ गुन्हे नोंद करण्यात आले असून त्यात १५३ वारस व १२५ बेवारस गुन्हे असून १४८ आरोपींना अटक करण्यात आली असून एकुण रु.५९,३१,८४५/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग व अन्य महामार्गावरील धाब्यांवर काही हॉटेल्समध्ये विदेशी मद्याच्या नावाने बनावट मद्याची विक्री केली जात असल्याबाबत विभागामार्फत माहे एप्रिल २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीत महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाअंतर्गत एकूण ३९२ गुन्हे नोंद करण्यात आले असून ३७३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्यात एकूण रु. १४,३५,९६८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी ठिबक व तुषार योजनेच्या अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(६७) * ४३७८५ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात सन २०१३-१४ मध्ये घेण्यात आलेल्या ठिबक आणि तुषार योजनेच्या सबसीडीची रक्कम माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहापर्यंत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अहमदनगर जिल्ह्यात ठिबक आणि तुषार योजनेचे साहित्य घेतलेल्या शेतकऱ्यांना सदर अनुदानाची रक्कम तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३)

अहमदनगर जिल्ह्याची सन २०१३-१४ मधील प्रलंबित रु.३४.३३ कोटी निधीची मागणी आहे. त्यापैकी उपलब्ध निधीच्या मर्यादेत रु. २४.०३ कोटी अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरीत निधी देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अल्प मदत मिळाल्याबाबत

**(६८) * ३९७१० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय पथकाच्या पाहणीनंतर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने अहमदनगर जिल्ह्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे २७८ कोटीची मागणी केली असता राज्य शासनाने १६४ कोटी ६० लाख रुपयांच्या नुकसान भरपाईला मान्यता देवून त्यापैकी ९३ कोटी ७० लाखांची मदत दिनांक ५ जानेवारी २०१६ रोजी जिल्हा प्रशासनाकडे दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७८ कोटीची कृषि विभागाची मागणी असताना १६४ कोटी ६० लाख रुपयांची मान्यता दिल्याने, सुमारे १११ कोटी कमी मिळणार असल्याने, अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय अंशत: खरे आहे.

खरीप २०१५ हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ५८१ गावांमध्ये दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१५ च्या आदेशान्वये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कोरडवाहू पिके, सिंचनाखालील पिके व बहुवार्षिक फळ पिके अशा वर्गवारीतील पिकांच्या नुकसानीबाबतची केंद्र शासनास रू.१६७.६ कोटीची मागणी नोंदविली होती त्यानुसार दि. २ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये रू.९३.६९ कोटी एवढी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम वितरीत करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील वीज वितरण कंपनीकडून नळयोजनेचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आल्याबाबत**

**(६९) * ४८१६४ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) या गावाला नळयोजनेद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेचा मालवण वीज वितरण कंपनीकडून ८१ हजार रुपयांच्या वीजबिलाच्या थकबाकीमुळे विज पुरवठा खंडीत करण्यात आल्याचे नुकतेच माहे जाने, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीजपुरवठा खंडीत करण्यात आल्यामुळे सुमारे २५० कुटुंबे अंधारात असून वीज वितरण कंपनीने चुकीच्या पध्दतीने मीटरची रिडींग घेऊन ज्यादा रक्कमेची विज बिले दिल्याचा आरोप ग्रामपंचायतीने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली व वीज पुरवठा तात्काळ पुर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. सदर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा दिनांक १४.१.२०१६ रोजी थकबाकी न भरल्यामुळे खंडीत करण्यात आलेला होता. त्यामुळे सुमारे २५० कुटूंब अंधारात होती ही बाब खरी नाही. पाणी पुरवठा योजनेच्या वीज जोडणीचे मिटर वाचन एजन्सीकडून योग्य प्रकारे न झाल्यामुळे जादा रक्कमेचे वीज बिल तद्नंतर अचुक मिटर वाचन करुन योग्य वीज देयक अदा करण्यात आलेले आहे.

(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) वीज जोडणीचे मिटर वाचन योग्य प्रकारे न झाल्यामुळे मिटर वाचन एजन्सीला निविदेतील अटी व शर्तीनुसार रु.५०० इतका दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच सहाय्यक लेखापाल, मालवण उपविभाग यांना सदर प्रकरणात हयगय केल्यामुळे सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून कृषी वीज पंपाची वीजदर वाढ पुर्ववत करण्याबाबत

**(७०) * ४७४७२ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून कृषी वीज पंपाना (सहकारी पाणी पुरवठा) आत्ता पर्यंत ७२ पैसे प्रति युनिट प्रमाणे वीज दर आकारणी केली जात होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने कोणतीही अधिसुचना न देता माहे जुन २०१५ च्या वीज बीलात प्रति युनिट ४४ पैसे दरवाढ करुन ०१ रुपये १६ पैसे प्रति युनिट अशी वीज आकारणी करुन वीज बिले सहकारी पाणी पुरवठा संस्थेच्या ग्राहकांना दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळसदृष्य परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने कृषीपंपाची वीज दरवाढ ही शेतक-यांना व सहकारी संस्थांना न परवडणारी असल्याने कृषी पंपाची (सहकारी पाणी पुरवठा) केलेली वीज दरवाढ रद्द करुन पुर्ववत सवलतीच्या दरात ७२ पैसे प्रति युनिट प्रमाणे वीज दर आकारणी करण्याबाबत शेतकऱ्यांकडून मोठया प्रमाणात मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वीजदर वाढ पुर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे, विद्युत नियामक आयोगाने दिनांक २६.६.२०१५ च्या वीज दर आदेशान्वये दिनांक १ जून, २०१५ पासून सुधारीत वीजदर लागू करेपर्यंत उपसा जलसिंचन योजनांना ७२ पैसे प्रति युनिट असा सवलतीचा दर आकारला जात होता.

(२) दिनांक ११.१०.२०१२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील कृषीपंप धारकांना पुरविण्यात येणाऱ्या वीजेच्या दरात सवलत देण्यासाठी महावितरण कंपनीला शासनाकडून प्रति युनिट किंवा प्रति अश्वशक्ती निश्चित रक्कमे इतके अनुदान देण्यात येते, त्या मर्यादेपर्यंतचे अनुदान कायम ठेवण्यात आले आहे. त्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक १ जून,२०१५ पासून सुधारित वीजदर लागू झाल्यामुळे उपसा जलसिंचन योजनांच्या सवलतीच्या वीजदरात ४४ पैसे प्रती युनिट अशी वाढ झालेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) उपसा जलसिंचन योजनांना विद्युत नियामक आयोगाचे वीजदर आदेश दिनांक २६.६.२०१५ व सवलतीबाबत दिनांक ११.१०.२०१२ च्या शासन निर्णयानुसार वीजदर आकारणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने अंदाजे ५५० कोटीचे वीज शुल्क माफ केल्याबाबत**

**(७१) * ४९६९४ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अंदाजे ५५० कोटीचे वीज शुल्क अनधिकृतपणे १३०८ उद्योगांना माफ करुन शासनाचे नुकसान केल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओपन ॲक्सेसद्वारे वीज वापरासाठी राज्यातील उद्योगांना परवानगी असल्याने त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०१४ पासून १३०८ उद्योगांना अंदाजे ६६२३ दशलक्ष युनिट्सचा वीजपुरवठा करण्यात आला असून, मुंबई विद्युत शुल्क अधिनियम १९५८ मधील कलम तीनमध्ये वीज वापरावर शुल्क आकारणीची तरतूद आहे त्यानुसार ६६२३ दशलक्ष युनिट्सवर वीज वितरण मंडळाच्या ८ रुपये प्रति युनिट आकारणी व ९.३ टक्के दराने वीज शुल्कही वसुल करणे आवश्यक असुन ही रक्कम अंदाजे ४९३ कोटी रुपये, या रक्कमेवर वीज विक्रीकर म्हणून अपेक्षित असलेले ६० कोटीही वसुल करण्यात आले नसल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने झालेले नुकसान भरुन काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. विद्युत अधिनियम, २००३ व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अधिनियम, २००५,२००७ व २०१४ नुसार राज्यातील विद्युत ग्राहकांना मुक्त प्रणालीद्वारे (ओपन ॲक्सेस) वीज वापरण्याची मुभा आहे. महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ मधील तरतूदीनुसार वीजेच्या वापरावर विद्युत शुल्क आकारण्यात येते. परंतु महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८

च्या अनुसूची मध्ये मुक्त प्रणाली (ओपनअ‍ॅक्सेस) ग्राहकांच्या वर्गवारीचा समावेश नसल्याने ओपन अ‍ॅक्सेसद्वारे वीज वापरणाऱ्या उद्योगांना विद्युत शुल्क आकारण्यात येत नाही.

(३,) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जैतापूर (ता.आष्टी,जि.वर्धा) शिवारात विजेचा शॉक लागून दोन शेतक-यांचा झालेल्या मृत्यू

**(७२) * ४३९०५ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर (ता.आष्टी,जि.वर्धा) शिवारात दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास विजेचा शॉक लागून दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मृत्यूमुखी पडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक,वर्धा यांनी दिनांक २०.१.२०१६ रोजी चौकशी केली आहे.

(३) सदर अपघात हा शेताच्या कुंपणांस अनधिकृतरित्या विद्युतभारीत केल्यामुळे घडला व सदर अपघातास महावितरण कंपनी जबाबदार नसल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयात वाळूच्या ई-निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(७३) * ४०१०१ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात वाळूच्या ई-निविदा प्रक्रियेत नागझिरी व कुवारखेडा या वाळू गटांसाठी अनुक्रमे १३ कोटी व १० कोटी रुपयांची ई-निविदा काढण्यात आली असून लिलावात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी असणारे अप्पर जिल्हाधिकारी यांची विभागीय चौकशी करुन लिलाव प्रक्रिया नव्याने राबविण्याची मागणी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी महसूल विभागाचे प्रधान सचिव व विभागीय आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) जळगांव जिल्ह्यातील नागझिरी व कुवारखेडा या वाळुगटाच्या निविदा प्रक्रीयेत अनियमितता झाल्याची तक्रार शासनास प्राप्त झाली होती. तसेच याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली असता त्या वाळूगटांची निविदा प्रक्रीया सदोष झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सदर बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून, निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रीया सुरु करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यात बस स्थानकाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(७४) * ५०३४८ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि. पालघर) तालुका हे बाजारपेठेचे मुख्य ठिकाण असून येथे बस स्थानकाचे बांधकाम कित्येक वर्षापासून अपूर्ण असून अद्यापर्यंत बससेवा सुरु झाली नसल्याने ग्रामीण भागातील उधवा, डहाणू, गिरगाव, चारोटी येथील व स्थानिक प्रवासी, विद्यार्थी, कर्मचारी वर्ग, उद्योजक, व्यापारी वर्ग यांमध्ये असंतोष असल्याचे दिनांक १ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, उक्त बस स्थानकाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत तसेच बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) व (३) तलासरी येथून तलासरी-उधवा-डहाणू-गिरगांव व चारोटी या मार्गावर पुरेशी राज्य परिवहन सेवा चालनात आहेत. तलासरी येथील बसस्थानकाचे बांधकाम माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. बांधकाम पूर्ण झालेल्या बसस्थानकापासून ५०० मीटर अंतरावरुन राज्य परिवहन बसेस सुरु करण्यात आलेल्या असून सदर बांधकाम पूर्ण झालेल्या बसस्थानकाचे उदघाटन करुन तात्काळ फेऱ्या सुरु करण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील कृषी विभागाने काळया यादीतील विक्रेत्यांना सिंचन संचिका पुरविण्याचे काम दिल्याबाबत

**(७५) * ५०००५ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील कृषीविभागांतर्गत ठिबक सिंचन घोटाळाप्रकरणी काळया यादीत समाविष्ट विक्रेत्यांना सिंचन संचिका पुरवण्याची कामे दिली असल्याचे नुकतेच माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रथम आठवडयात निदर्शनास आले आहे हे खरे आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात ठिबक सिंचन विक्रेत्यांनी कोरडवाहू शेती अभियानांतर्गत बनावट कागदपत्राअधारे बोगस लाभार्थ्यांच्या नावे सिंचनाचे

अनुदान उचलले असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी कृषी मंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

मे. कोठारी अग्रोटेक प्रा.लि. या ठिबक संच उत्पादक कंपनीचे जालना जिल्ह्यातील वितरक मे. साई एन्टरप्राईजेस, कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी यांचे नाव मार्च, २०१५ मध्ये काळ्या यादीत टाकल्यानंतर त्यांचेकडून एकही प्रस्ताव स्विकारण्यात आला नाही. तथापि, काळ्या यादीत नाव टाकण्यापूर्वी ज्या शेतक-यांनी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात त्यांच्याकडून सुक्ष्म सिंचन संच बसवून घेतले होते अशा शेतकऱ्यांच्या सुक्ष्म सिंचन संचाची मोका तपासणी केल्यानंतर देय अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(२) मा. मंत्री (कृषि) यांच्या कार्यालयात अशी कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे अढळून आले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महावितरणाच्या दक्षता व सुरक्षा विभागाच्या तपासणीमध्ये पुणे परिक्षेत्रात वीज चोऱ्या उघडकीस आल्याबाबत

**(७६) * ४९२०३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, महावितरणच्या दक्षता व सुरक्षा विभागाच्या तपासणीमध्ये पुणे परिक्षेत्रात माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान १ महिन्यांत तब्बल ५०३ वीज चोऱ्या निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात वीज चोरीच्या घटना निदर्शनास येत असतांना अनियमित व संशयास्पद वीज वापर होत असलेल्या वीज जोडण्या तपासणीच्या दृष्टीने महावितरणाने विशेष पथकाची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वीज चोरी करणाऱ्यांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३)सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(४) वीज चोरी करणाऱ्यांवर विद्युत कायदा,२००३ च्या कलम १३५ व कलम १२६ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच वीज चोरी प्रकरणात कंपनीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे किंवा कसे याची शहानिशा करण्यासाठी दक्षता व सुरक्षा विभागाकडून चौकशी करण्याचे आदेश पारित करण्यात येतात व त्यानुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कानळदा (ता.जि.जळगांव) रस्त्यावरुन मध्यरात्री होणारी अवैध वाळूची वाहतूक**

**(७७) * ४०११० श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कानळदा (ता.जि.जळगांव) रस्त्यावरुन मध्यरात्री वाळू माफिया वाळूची मोठया प्रमाणात वाहतूक करित असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू वाहतुकीसाठी ट्रॅक्टर, डंपरचा वापर होत असल्याने या वाहनांमुळे या रस्त्यावर तीन वर्षात भिषण अपघात झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आव्हाणे फाटयानजीकच्या एका पेट्रोल पंपासमोर युवकाचा मृत्यू झाला असतांनाही पिलखेडा, खेडी,खुर्द, फुफनगरी येथून वाळूची चोरटी वाहतूक राजरोसपणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्नातील भागात वाळूची अवैध वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत. वाळू वाहतुकीसाठी ट्रॅक्टर व डंपरचा वापर होत असून, वाळू वाहतुकीच्या वाहनाने अपघात झाल्याच्या काही घटनाही निदर्शनास आल्या आहेत. तथापि, तहसिलदार जळगांव यांनी माहे एप्रिल २०१५ ते फेब्रुवारी २०१६ या कालावधीत कानळदा, पिलखेडा व फुपनगरी या परिसरात गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणांमध्ये १२१ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन, रु. २८,१९,७००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच जळगांव तालुक्यात इतर ठिकाणी गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीच्या प्रकरणांमध्ये १९७ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु ३८,९६,४५०/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, २८ व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.